शनिवार, ६ जुलै २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ३०१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 6 JULY 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-301 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# सरकारमधील लोकांचा डांबरात भ्रष्टाचार, सरकारच्या तोंडाला फासले काळे

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उघड केला घोटाळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शुक्रवारी विधानसभेत पुरवणी मागणीवरील चर्चेदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागातील डांबर घोटाळा उघडकीस आणला. सरकारमधील मंत्र्याच्या वरदहस्ताने डांबरच्या बिलातून शेकडो कोटी रुपये उकळले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. आर. डी. सामंत कन्स्ट्रक्शन नावाची एक कंपनी आहे. ही कंपनी रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक शासकीय कामांचे कंत्राट घेते. आपल्या सरकारमधील एका मंत्र्यांचे (पालकमंत्री उदय सामंत) सगेसोयरे या कंपनीमध्ये कार्यरत आहे. या मंत्र्यांचा वरदहस्तामुळे या कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभाग, एमआयडीसी, नॅशनल हायवे इत्यादी विभागांमधील कामे घेऊन प्रचंड मोठा घोटाळा केला आहे.**

**पहिले उदाहरण** : या कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रत्नागिरी येथील रेवस रेड्डी रोडचे रुंदीकरण आणि डांबरीकरणाचे काम केले. या कामासाठी वापरलेल्या डांबराच्या बिलाचा नंबर आणि रत्नागिरी एमआयडीसी पाणीपुरवठा योजनेंतर्गत ऍपरोच रोड ते जॅकवेलपर्यंत जाणाऱ्या डांबरी रस्त्याचे नुतनीकरण करण्याच्या कामासाठी वापरलेल्या डांबाराच्या बिलाचा नंबर एकच आहे. (बिलाचा नंबर – BPCL 4582111044) म्हणजेच या दोन्ही कामांसाठी एकच डांबर बील वापरून पैसे काढण्याचे काम झाले आहे.

**दुसरे उदाहरण** : नेवरे भांडारपूळे रोड या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केलेल्या रस्ता रुंदीकरण आणि ब्लॅक टॉपींग कामासाठी वापरलेल्या डांबराचे पावती क्रमांक BPCL 4582165210 हा आणि MIDC अंतर्गत रत्नागिरी पाणी पुरवठा योजना अंतर्गत हार्चेरी जॅकवेल पर्यंत जाणारा ॲप्रोच रस्ता पुर्नडांबरीकरणाचे केलेले कामाचे डांबराच्या बिलाचा नंबर देखील सारखाच आहे. म्हणजेच या दोन्ही कामासाठी देखील एकच डांबर बील वापरून पैसे काढण्याचे काम झाले आहे.

**तिसरे उदाहरण** : माहे एप्रिल 2023 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर रत्नागिरी अंतर्गत उपविभाग क्रमांक 1 यांनी निवळी जयगड या रस्ता कामासाठी वापरुन संपवलेली डांबराची बिले माहे ऑगस्ट 2023 मध्ये पुनश्च 1) Rehabilitation & Upgradation of NH-66 (Old NH-17) कांटे ते वालकेड 2) Rehabilitation & Upgradation of NH-66 (Old NH-17) अरावली ते कांटे या दोन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कामांसाठी दाखवून 8 कोटी 52 लाख 53 हजार 641 रुपये उकळले आहेत. यात महत्वाची बाब म्हणजे टेंडर मधील अटी व शर्तीनुसार ज्यावेळी अभियंता डांबराचा वापर दाखवतो त्यावेळी ठेकेदाराने दिलेल्या ओरीजनल बिलावर क्रॉस करुन कार्यालयाचा सही शिक्का मारुन त्याची झेरॉक्स ठेकेदाराला इतर लेखा ठेवण्यासाठी परत द्यावयाची असते. ज्यावेळी डांबराची बिले माहे एप्रिल २०२३ मध्ये उपअभियंता सा.बां. उप विभाग क्र.१ यांनी वापरली त्यावेळी बिल क्रॉस न करता ओरिजनल डांबराची बिले ठेकेदाराला परत केल्याने तीच बिले ठेकेदाराने दुसऱ्या कामासाठी म्हणजेच राष्ट्रीय महामार्गावर वापरुन, न केलेल्या कामाच्या बिलाची रक्कम घेतलेल्या आहेत. या सर्व कामामध्ये संगमताने साडे आठ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचा अपहार झालेला आहे असे जयंत पाटील यांनी सभागृहात सांगितले.

ही उदाहरणे देत असताना जयंत पाटील यांनी या कंपनीने अशा प्रकारचे शेकडो कोटीचे अनेक भ्रष्टाचार केले आहे असा आरोप देखील केला. तसेच या प्रकरणात अनेक अधिकारीही सामील असून तेही या भ्रष्टाचारास तितकेच जबाबदार आहेत असे ते म्हणाले. संबंधित अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत. या कंपनीने केलेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी. तसेच, आपण या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कंपनीवर व दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी करण्याचे निर्देश द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

# मराठवाड्यात येत्या तीन दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सर्वदूर मान्सून पोहोचला असून मराठवाड्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने तसेच प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. दरम्यान, काही जिल्ह्यांना (5जुलै) जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय. मागील चार दिवसांपासून पावसाचा जोर ओसरला असून काही ठिकाणी हलक्या सरींचा पाऊस झाला. दरम्यान, पुढील तीन दिवसात पावसचा जोर वाढणार असून मराठवडयात या आठवड्यात पाऊस सरासरीहून अधिक राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता असून वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम सरींचा पाऊस येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यावेळी वाऱ्याचा वेग ३० ते ४० किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे. या दोन्ही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मागील चार दिवसांपासून या दोन्ही जिल्ह्यात पावसाने दडी मारली असून तुरळक ठिकाणी हलक्या सरींनी हजेरी लावली. दरम्यान, आज दोन्ही जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आहे.

मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम सरींची हजेरी राहणार असून येत्या तीन दिवसात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने वर्तवले. परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या हलक्या सरींचा अंदाज देण्यात आला असून त्यानंतर यलो अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यात दिनांक 10 ते 16 जूलै 2024 दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे.

# ईडब्ल्यूएस, एसईबीसी, ओबीसी विद्यार्थिनींना शिक्षण आणि परीक्षा शुल्क परत मिळणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील ईडब्ल्यूएस, एसईबीसी व ओबीसी विद्यार्थिनींसाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय जाहीर केला आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग(एसईबीसी) तसेच इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कामध्ये 50 टक्क्यांऐवजी आता 100 टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीला मंजुरी दिली आहे.


राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक सुरू आहे. अर्थसंकल्पातल्या घोषणांच्या अंमलबजावणीसाठी 19 महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे. यामध्ये गरजू महिलांना रोजगारासाठी पिंक ई रिक्षा उपलब्ध करून देणे, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय, काजू उत्पादक शेतक-यांना अनुदान, नविन पर्यटन धोरणासह इतर अनेक विषय कॅबिनेट बैठकीत येणार आहे. तसेच काजू उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याचा निर्णय याचबरोबर नविन पर्यटन धोरणासह इतर अनेक विषय कॅबिनेट बैठकीत येणार आहेत.

# फेरीवाल्यांवरील कारवाई थांबवा : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईसह राज्यातील इतर शहरात अंदाजे ३० लाख फेरीवाले आहेत पण त्यांच्यासाठी ठोस धोरण नसल्याने आजही ते त्यांच्या हक्कांपासून वंचित आहेत. २०१४ साली लोकसभेने फेरीवाल्यांसदर्भात कायदा केला व सर्व राज्याने तशाप्रकारे फेरीवाला धोरण आखणे अपेक्षित होते परंतु १० वर्षानंतरही राज्यात फेरीवाल्यांसाठी ठोस धोरण नाही. केवळ योजना नसल्याने फेरीवाल्यांना अमानुष वागणूक मिळते, त्यांचे साहित्य जप्त केले. सरकारने फेरीवाल्यांबद्दल ठोस धोरण आखावे तोपर्यंत सध्या पावसाळ्यात होत असलेली कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


वाडिया कॉलेजात वैद्यकीय शिक्षण घेत असताना, कॉलेजला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची जी मान्यता लागते, ती मिळाली नाही आणि मग पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना दोन वर्षांसाठी फिलिपिन्सला जावं लागेल असं सांगण्यात आलं. खरं तर लहान मुलगा, नवरा, आपला घर आणि आपला देश सोडून एकदम अशा अनोळखी देशात जाणं ही कोणत्याही स्त्रीसाठी अत्यंत कठीण गोष्ट होती. पण शारदाताईंना आपल्या मुलाचा आणि पतीचा मानसिक पाठिंबा यावेळी लाभला. अर्थात तेही जाणून होते की आता डॉक्टर होण्यापासून कोणीही त्यांना परावृत्त करू शकत नाही. फिलिपिन्सला गेल्यावर एक वर्ष पुढील शिक्षण आणि एक वर्ष इंटर्नशिप ज्याला तिकडे क्लार्कशीप म्हणतात, ते करावे लागणार होते. आणि हा सगळं दिनक्रम अतिशय शारीरिक आणि मानसिक परीक्षा पाहणारा होता. याच दरम्यान त्यांना असं आढळलं की त्यांच्या कॉलेजजवळ वैमानिकाचं प्रशिक्षण देणारे एक खाजगी केंद्र आहे. त्यांच्या कॉलेजला शनिवार, रविवार सुटी असायची. या सुट्यांचा उपयोग करून घेऊन त्यांनी तो पायलटचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यात त्यांना अनेक विषयांचा अभ्यास करावा लागला.




## हितगुज



पुष्प १०८वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## ईश्वरत्वाची प्रचिती

श्री स्वामी समर्थ भाविकांनो, अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त भगवान ज्ञानाचे सगुण, साकार रूप, योगाची सजीवता, सर्वसिद्धींचे माहेरघर, चराचरा विषयीचा निर्हेतूक कळवळा आहेत. सर्व ब्रम्हांडाचे गुरुपद घेतलेल्या श्री दत्त महाराजांचा अवतार अन्यायाचा अंधार नाहीसा करून ज्ञानाच्या प्रकाशात ईश्वरीय गुणांचे संवर्धन करण्यासाठी झाला आहे आणि म्हणूनच विविध उद्धारक शक्ती एकवटल्या आहेत. भगवान ब्रम्हदेव नित्य नव्या संरचनांचा,सृष्टीचा निर्माण करणारे,श्रीविष्णू प्रतिपाळ,कल्याण करणारे,श्री शिव भगवान त्यातल्या चेतनांचे रक्षण करून असत, अमंगळाचा संहार करणारे, हे तीन देव एकवटून दत्त रूपात अवतीर्ण झालेत. ही बाब सूक्ष्म अर्थ उद्घाटित करणारी आहे.श्री दत्त महाराज अध्यात्माचे प्रतिबिंब आहेत. भारतीय अध्यात्म जीवा शिवाच्या मिलनाने पूर्ण होते. हे अद्वैत, पूर्णऐक्य होण्यासाठी साधकाची यात्रा यंत्र, मंत्र, तंत्राचा अवलंब करीत समृद्ध होत जाते.ही तीन साधने देवतांची अधिष्ठाने आहेत. यंत्राच्या त्रिकोणादि रेखाकृती ब्रह्मदेवाच्या चैतन्याची खूण आहेत. मंत्रादि अक्षरातून अभिव्यक्त प्रसारित होणाऱ्या नादात्मक लहरीतून श्री विष्णूचे मांगल्य प्रसारण पावते. तंत्रातून दैनंदिन दुखांचा परिहार करीत शिवाची कल्याण कामना मायेचा परिहार करते. सत+चीत +आनंद, सत+शिव+ सुंदर याचे अद्भुत संमिश्रण अनुभवणे म्हणजे ईश्वराची प्रचिती घेणे.ही प्रचिती श्री दत्त महाराजांच्या सेवा भक्तीतून अनुभवायला मिळते.श्री दत्त महाराजांनी सृष्टीशी ज्ञानानुसंधान कसे बांधावे हे विशद करण्यासाठी आपल्या अवतारा काळात 24 गुरू केले होते. या विश्वातल्या लहानात लहान गोष्टी मधून बोध कसा घ्यावा, गुणग्राहकता, बोधात्मकता, निर-क्षिर -विवेक -चातुर्य कसे असावे, या त्यांच्या गुर कथेतून व्यक्त झाले आहे.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

त्यायोगे नाड्यांमध्ये मलाचा संचय होणार नाही व प्राणायाम सोपा होऊन नाड्यांमध्ये होईल, व चक्रांचा भेद होईल आणि योग्याला



अनाहत ध्वनी ऐकू येईल. कमी खाण्याप्रमाणेच साधकाने कमी बोलायला हवे. योग्याने वादविवादात कधीही भाग घेऊ नये. तसेच मूर्खांशी मैत्री करू नये. योग्याने हे सर्व नियम पाळून आपल्या कुंडलिनीला जाग आणून त्या महाशक्तीला ब्रह्मारंध्रामध्ये नेऊन बसवायला हवे. तसेच योग्याने आत्मस्थ होऊन प्राणायामाची साधना नियमितपणे करायला हवी. तसेच, शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी दर तीन-चार महिन्यांच्या अंतराने त्याने कायाकल्पही करायला हवा, इत्यादी. श्रीगोरक्षनाथांच्या ग्रंथांवरून त्यांच्या अशा तत्त्वज्ञानाची आपल्याला ओळख होते. गोरक्षनाथांच्या काळात भारतातील अनेक धर्मसंप्रदायांमध्ये वामाचार सुरू झाला होता आणि पंचमकरांना (मांस, मद्य, मैथुन इ.) प्रमाणाबाहेर महत्व प्राप्त झाले होते. स्वतःला साधक म्हणविणारे आपल्या वासनापूर्तीसाठी याचा सर्रास उपयोग करीत होते. याला पायबंद घालण्यासाठी गुरु गोरक्षनाथांनी साधनांची पवित्रता, शुद्ध चारित्र्य आणि संयमपूर्ण नीतिमान जीवनाचे महत्व आपल्या ग्रंथाद्वारे व उपदेशाद्वारे साधकांना पटवून देण्याचे फार मोठे कार्य केले, व स्वतःचाच आदर्श त्यांच्यापुढे ठेवला. त्यांचे दुसरे महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी शैव संप्रदायाचे संघटन करून तो संप्रदाय बलशाली केला, व त्यात नीतिमान, सदाचारी व संयमी साधक निर्माण केले. तसेच, त्यांनी या पंथात जातिभेद वा धर्मभेद कधीही मानला नाही. त्यांनी यवनांनाही तितक्याच मुक्तपणे आपल्या पंथात प्रवेश दिला. आद्य शंकराचार्यांनी मोक्षासाठी जसे ज्ञानमार्गाला प्राधान्य दिले तसेच गोरक्षनाथांनी त्याच ध्येयपूर्तीसाठी योगमार्गाला महत्व दिले. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ आधार 'सांख्यमत' हा असून 'पिण्डी ते ब्रह्माण्डी' या गोष्टीवर त्यांचा मुख्य भर आहे. आपल्या शरीरात सारे ब्रह्माण्डसूक्ष्म रूपाने वसत आहे असे त्यांच्या 'सिद्धसिद्धान्तपद्धती' या ग्रंथात स्पष्टपणे सांगितले आहे. मृत्यूनंतरची मुक्ती ही गोरक्षांच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. मंत्रयोग, लययोग, हठयोग आणि राजयोग यांच्या साहाय्याने नाथयोगी आपल्या देहालाच शिवस्वरूप बनवून याच देही मुक्त होऊ शकतो नि यासाठीच षट्चक्रे, पंचआकाश, नवद्वारे इ. चे सम्यक् ज्ञान नाथयोग्याला असणे आवश्यक आहे. कुण्डलिनी जागृतीलाही नाथसंप्रदायात विशेष महत्वाचे स्थान आहे. कारण या कुण्डलिनीशक्तीच्या द्वारेच जीवशिव सामरस्याचा अनुभव नाथयोग्याला येतो. मात्र हा अनुभव गुरुकृपेवाचून मिळणे दुरापास्त असल्यामुळे नाथपंथात गुरुला अपरंपार महत्व आहे. अशा गुरुच्या ठिकाणी ३६ लक्षणे वा गुण असावयास पाहिजेत. एवढेच नव्हे, तर शिष्यातही ३२ लक्षणे वा गुण असल्यावाचून त्यास शिष्य होता येत नाही. या संप्रदायात शरीर हेच मोक्षप्राप्तीचे किंवा कैवल्यप्राप्तीचे साधन असल्यामुळे ते उपेक्षणीय समजले जात नाही.



आधुनिक केसरी


## होईन आनंदी | तुझ्या कृपे ||

नको मुखी निंदा | नको दुराचार ||
वृत्ती सदाचार | मनी वसो ||१||
असु दे तत्पर | दानधर्मासाठी ||
अहंकारापाठी | लावू नको ||२||
रूजावा अंतरी | सात्विक संस्कार ||
त्यावीन संसार | फळा न ये ||३||
वृक्षाचिया मुळा | पाणीयाचि ओढ ||
तैसे मना वेड | गोविंदाचे ||४||
तुझ्या नामे देवा | घालीन गवांदी ||
होईन आनंदी | तुझ्या कृपे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

शब्द सुरति सम तार है,
चन्द्र चकोर स्वभाव ।
शिखा अखण्ड अकम्प है, ध्यान
स्वलक्ष्य प्रभाव ।।२५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/२५


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ज्याप्रमाणे चकोर चंद्रास एकटक पहातो, त्याचप्रमाणे शब्दात म्हणजेच परब्रह्मात सुरति (आत्म्याची चेतन शक्ती) एक समान लागलेली आहे आणि या आपल्या लक्ष्याच्या अखंड, कंपहीन ज्योतीला पहाणे म्हणजे ध्यान होय. एकतार ध्येयात दृष्टी लावणे ध्यान आहे. ध्यानात आत्म्याची चंद्र-चकोरवत् स्थिती रहाते. हे ध्यान जड प्रकृतीच्या पलीकडे, चेतन द्वारा चेतन प्रदेशात होते. जोपर्यंत ध्येय प्रत्यक्ष नाही, तोपर्यंत ध्यान होत नाही. म्हणून ध्येयास पहाणे हे ध्यान आहे. ध्यानात ध्याता आणि ध्येय यांचा भाव असतो. यालाच त्रिपुटी म्हणतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आपली सुखदु:खे श्रीरामाला सांगा

आधुनिक केसरी

तुम्ही सर्वजण छान सेवा करता आहात ह्याबद्दल शंका नाही. अशीच सेवा अखंड चालू ठेवा, त्यातच कल्याण आहे. त्यानेच आपण तरून जाऊ. जरी कुणी काहीही सांगितले, ' ह्यात काय आहे, त्यात काय आहे, ह्याने काय होणार आहे, ' असे म्हटले, तरी तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका. परमेश्वराची सेवा वाढवावी तेवढी थोडीच आहे. तो फार मोठा आहे, अमर्याद आहे. त्याला पहायला तशीच सेवाही फार मोठी करायला पाहिजे. त्याला पाहण्यासाठी तशी मोठी शक्तीही आपल्याला लागेल. अर्जुनाला श्रीकृष्ण परमात्म्याने दिव्य दृष्टी देऊन दर्शन घडविले. ती दिव्य दृष्टी आपल्याजवळ नाही, पण ती मिळविण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. भक्तीची प्रगती ही खरी शक्ती; आणि त्याकरिता अखंड नामस्मरण हेच खरे साधन. श्रीरामप्रभू आपल्या घरातला कुणीतरी आहे याबद्दल खात्री बाळगा. त्याला तुम्ही आपली सुखदुःखे सांगा. दिवसाकाठी एकदा तरी रामापुढे उभे राहून त्याला अनन्यभावाने शरण जा; दिवस आनंदात



जाईल आणि तुमचे दुःख दूर होईल. आपले ज्ञान, शक्ती, वैभव, सत्ता त्याच्यापुढे काहीच नाहीत. तेव्हा या सर्वांचा विसर पाडून, त्याला शरण जा, आणि त्याच्याजवळ प्रेम मागा. " देवा ! आम्ही जे तुझे दर्शन घेतो ते सर्व बाह्य स्वरूपाचे; तुझे आम्हाला खरे दर्शन घडव. आम्ही अवगुणसंपन्न असू, तुझे दर्शन व्हावे एवढी सेवा आमच्याजवळ नाही, परंतु तू आता आम्हाला क्षमा कर. यापुढे, देवा, कितीही संकटे येवोत, आमच्या प्रारब्धाचे भोग आम्ही तुझ्या नामात आनंदाने भोगू. जे काही व्हायचे असेल ते होऊ दे, आमचे समाधान टिकून तुझ्या नामात आमचे प्रेम राहील एवढी तुझी कृपा असू दे. खरोखर, परमेश्वर भक्ताचे मन पाहतो, त्याचा भाव पाहतो; एरव्ही तो त्याच्याजवळच असतो. जो श्रद्धेने परमेश्वराचे चिंतन करतो त्याला, परमेश्वरजवळ असून आपल्याला तो मदत करायला सिद्ध आहे याची खात्रीच असते. आपल्याला दोन मार्ग आहेत; एक श्रद्धेचा, आणि दुसरा अनुभवाचा. एका गावी पायवाटेने गेले तर फक्त तीन मैलांचे अंतर, आणि मोटरच्या रस्त्याने गेले तर दहाबारा मैलांचे अंतर. श्रद्धा ही त्या पायवाटेसारखी आहे. तिने चालले तर अंतर कमी पडेल. मोटारीचा मार्ग म्हणजे अनुभवाचा मार्ग. मोटार कुठे रस्त्यात बिघडली, किंवा वाटेत कुठे अडथळा आला, की प्रगती थांबते; त्याप्रमाणे अनुभवात काही चुकले की प्रगती खुंटते. तेव्हा शक्यतो आपण श्रद्धेचा मार्ग पत्करावा. सद्गुरूच्या शब्दावर विश्वास ठेवून श्रद्धेने आणि प्रेमाने नाम घ्यावे.

**१८७. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय.**

## संदेहवारण

आधुनिक केसरी

खरं सांगू का वाचक मित्रांनो आज संपूर्ण दिवस गेला विचार करण्यात



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

की समासाला सुरुवात कुठून करायची. मग मला सन्माननीय बेलसरे सरांची आठवण आली. त्यांचे विचार मनामध्ये सतत घोळवत होते त्यामुळे लिहायला प्रेरणा मिळाली. समर्थांना आणि बेलसरे सरांना मनापासून वंदन करते आणि लिहायला सुरुवात करते. या अफाट विश्वात पंचमहाभूते जोपर्यंत जिवंत आहेत. आकाशात तारे आहेत, सुर्यनारायण तळपतो आहे. चंद्राच्या टिपूर चांदण्याचे वेड लहान बालकांना आणि प्रेमिकांना मोहित करत आहे. विश्वाच्या या अफाट पसा-यात प्रत्येक जीव आपले अस्तित्व टिकवून ठेवतो आहे.या व अशा अनेक ब्रम्हव्याप्त घटना,गोष्टी या पृथ्वीतलावर जोपर्यंत घडत रहातील तो पर्यंत हे अनादी विश्व व विश्वाच्या पसारा सतत वाढू लागणार आहे.

यातील आपल्याला न समजणाऱ्या गोष्टी समजून घेण्याचा विचार आपण या समासात करणार आहे. ब्रम्ह आणि ब्रम्हांड यांचा परस्पर संबंध काय आहे. वेदांतातील एक खूपचं अवघड प्रशन्धं आहे. समासाचा व त्या अनुषंगाने या अवघड प्रश्नांची उत्तरे म्हणजे हा समास आहे. ही फक्त सुरवात आहे शेवटाला गेल्यावर आपण कुठे पोहचलो यांची कल्पना येईल.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ६ जुलै २०२४

adhunikkesari.com


# न. पा. कर्मचाऱ्यांना मनोज पवार यांनी धरले धारेवर

## कारवाई करण्याचे मनोज पवार यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** नगर परिषदमध्ये प्रशासनाने नेमणूक केलेले स्वच्छता कर्मचारी कामात दुर्लक्ष करत असल्याने शहरातील नाले सफाईचा बोजवारा उडाला आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. हि बाब नागरीकांनी कानावर टाकताच मनोज पवार त्या ठिकानी जाऊन पाहणी केली असता घाणीचे साम्रज्य दिसताच सफाई कर्मचारी यांना चांगलेच फैलावर घेतले. कारवाईचे निवेदन मुख्यअधिकारी देण्यात आले. या संदर्भात उद्योजक मनोज पवार यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की कन्नड शहरातील जागोजागी गटारी तुडूंब भरून रस्त्यावरून वाहत आहेत. गल्लीबोळात कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आपले स्वच्छता मुकादम, सफाई कामगारांकडून जागे वर उभे राहून काम करुन घेत नाही. कामगारांनी गटारी साफ केल्यानंतर गटारींच्या कडेला टाकलेली घाण डुकरे, कुत्रे पुन्हा गटारीत लोटल्या जात आहे, रस्त्यांवर पांगवली जात आहे. या प्रकरणी आपण स्वतः लक्ष घालून या मुकादमांची कानउघडणी करावी, त्यांच्यावर कारवाई करावी. मानवी हक्क आयोगानुसार प्रत्येक नागरिकाचा अधिकाराची पायमल्ली होऊ नये असेही त्यांनी या निवेदनात नमूद केले आहे. आता मुख्य अधिकारी काय कारवाई करतील या कडे शहरातील नागरीकांचे लक्ष लागले आहे .



# साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान निर्मित नवीन शैक्षणिक संकुलात श्री साईबाबा कनिष्ठ व श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालय स्थलांतर शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाले असल्याबाबतची माहीती श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. गुरुवार दि. ०४ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा या संकुलात श्री साईबाबा कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांचे स्थलांतर शुभारंभ कार्यक्रम श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश सुधाकर यार्लगड्डा यांचे हस्ते व मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाला. याप्रसंगी उप मुख्यकार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, आदी सह प्रशासकिय अधिकारी हजर होते संरक्षण अधिकारी रोहिदास माळी तसेच संस्थान कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या माध्यमातून शिर्डी व परिसरातील गरीब विद्यार्थ्यांना अल्पदरात शिक्षण दिले जाते. या विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देणेच्या उद्देशाने संस्थानने नवीन शैक्षणिक संकुलाची निर्मिती करणे कामी



निमगांव-को-हाळे हद्दीतील गट नं.१८३ मध्ये १३.५ एकर जागेत या संकुलाचे भूमीपुजन शताब्दी वर्षांत पंतप्रधानह नरेंद्र मोदी यांचे हस्ते १९ ऑक्टोंबर २०१८ रोजी करणेत आले होते. यासाठी २६७ कोटी रुपये खर्च आलेला असून यामध्ये इंग्लिश मेडीयम स्कुल, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय तसेच कन्या विद्या मंदिर यांकरीता स्वतंत्र व्यवस्था करणेत आलेली आहे. प्रत्येक इमारतीत डिजीटल क्लासरुम, सुसज्ज प्रयोगशाळा, आर्ट हॉल, ग्रंथालय, भोजन कक्ष इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. याच बरोबर १०५० आसन क्षमता असलेले ऑडीटोरीयम, जिम, बैडमिंटन हॉल, टेबल टेनिस, कैरम या सारख्या खेळांसाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. याचप्रमाणे जलतरण तलाव व इतर खेळांसाठीही मैदान तयार करणेत आलेले आहे.शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ अभियंता श्री गणेश कोराटे यांचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करणेत आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता दिनकर देसाई यांनी केले तर प्राचार्य गंगाधर वरघुडे यांनी आभार प्रदर्शन केले व प्रा. डॉ. सोनाली हरदास यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

# ताडाळी येथे मुक्त संचार करत असलेल्या वाघाला जेरबंद करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मागील काही दिवसांपासून ताडाळी परिसरात वाघाचा मुक्त संचार असून येथील पाळीव जनावरांना वाघाने ठार केले आहे. परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. त्यामुळे सदर वाघाला तत्काळ जेरबंद करा, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर वनवृत्त क्षेत्राचे मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर यांना केल्या आहेत. ताडाळी येथील नागरिकांना मागील काही दिवसांपासून वाघाचे दर्शन होत आहे. त्यातच काल वाघाने ताडाळी आणि चारगाव शिवारात म्हैसवर हल्ला करून ठार केले. तर आज ताडाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शेजारी गावात वासरू व बकरीवर हल्ला करून ठार केल्याने गावात दहशत निर्माण झाली आहे. सध्या शेतीचे हंगाम सुरू असल्याने शेतकरी शेतीविषयक काम करण्याकरिता शेतात जातात.त्यामुळे सदर परिसरात मानव आणि वन्यजीव संघर्ष होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता कोणतीही मानवी जीवितहानी होण्याआधी सदर वाघाला जेरबंद करण्याकरिता वन विभागाची चमू पाठवून वाघाला जेरबंद करावे, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहेत. सदर मागणीचे पत्रही त्यांच्या वतीने मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर यांना पाठविण्यात आले आहे.

# विद्यार्थीनीस मारहाण शिक्षकावर खुनाचा गुन्हा दाखल




आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** कोपरगाव तालुक्यातील पडेगाव येथील चारी नंबर ४५ जवळ असलेल्या शाळेमध्ये माझी मुलगी कुमारी तृप्ती दीपक भोसले वय ९ राहणार पडेगाव ही एक जुलै रोजी शाळेमध्ये गेली होती शाळेत उशिरा गेल्याने शाळेतील शिक्षक सुनील दिगंबर हांडे यांनी तृप्ती हिला वर्गाच्या बाहेर उभे केले व तिच्या छातीत धक्का दिला त्यामुळे ती पायऱ्यावर खाली पडून गंभीर जखमी झाली तिला पुढील उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले मात्र उपचारात दरम्यान तृप्तीचा मृत्यू झाला अशी तक्रार मुलीची आई उमा दिपक भोसले वय ३५ राहणार पडेगाव हिने कोपरगाव शहर पोलीसात तक्रार दाखल केल्याने कोपरगाव पोलिसांनी शिक्षक सुनील दिगंबर हांडे व ४५राहणार निवारा कोपरगाव यांच्याविरुद्ध भाजप कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# सरकारकडून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचे काम : खा. सुळे

## 1500 रुपयांत काय येणार? 'लाडकी बहीण'वरुन सरकारला सुनावलं!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेव्हापासून महाराष्ट्राच्या गृहमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली आहे तेव्हापासून राज्यात गुन्हेगारी वाढली आहे. ही जबाबदारी स्वीकारण्यात देवेंद्र फडणवीस पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. गुन्हे फक्त मोठ्या शहरांमध्ये वाढले नाहीत, तर संपूर्ण महाराष्ट्रात वाढले आहेत. हा माझा डेटा नाही, तो केंद्र सरकारचा डेटा आहे. देवेंद्र फडणवीस पूर्णपणे अपयशी गृहमंत्री आहे. असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजना मी स्वतःमाहिती घेतली. १५०० रुपयांत किती रेशन येते याचा मी अभ्यास केला. या योजनेचं मी स्वागत करते. परंतु १५०० रुपयांत आमच्या महिला भगिनींना खरेच किती दिलासा मिळणार आहे? याचाही विचार केला पाहिजे. महागाई, भ्रष्टाचार आणि बेरोजगारी आहे. १५०० रुपयांत कधी तुम्ही विचार केलाय का डाळ किती रुपयाला आहे?, कुणीतरी माझ्यासोबत किराणा मालाच्या दुकानात चला, महिनाभराचं सामान, भाजी खरेदीसाठी हे पुरण्यासारखं आहे का याचे उत्तर द्यावे असा टोला त्यांनी सरकारला लगावला. सुप्रियाताई सुळे पुढे म्हणाल्या की, तसेच महाराष्ट्रातही कृषी विभागात भ्रष्टाचाराचे आरोप झालेले आहेत. ११८ कोटी भ्रष्टाचाराचा आरोप आहे. आरएसएसच्या माध्यमातून ही माहिती पुढे आली. या भ्रष्टाचाराचा पाठपुरावा त्यांनी केला.



देवेंद्र फडणवीसांना ते भेटले परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे संसदेत बजरंग सोनवणे त्यावर बोलणार होते. महाराष्ट्राला या गोष्टीचं उत्तर मिळालं पाहिजे अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे केली आहे. शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचं पाप या देशात आजच्या सरकारने केले आहे असा आरोप खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केला. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, दरम्यान, कोविडमध्ये स्वतःचे फोटो लावण्याचं या लोकांनी सोडलं नाही. त्यामुळे कुठेही जाहिरातीवर फोटो लावतील. कधी ट्रिपल इंजिन सरकार, कधी डबल इंजिन सरकार बोललं जातं. नेमकी किती इंजिन हे कळत नाही. कारण त्यांचा प्रत्येक पक्ष प्रवक्ता विविध नंबर सांगतो. कुणाचे फोटो लावून कोण काय क्रेडिट घेतो हे महायुतीच्या बॅनरवॉरमधून दिसते असा चिमटाही सुप्रियाताई सुळेंनी काढला आहे. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, महिलांच्या बाबतीत सातत्याने पातळीसोडून प्रतिक्रिया सत्तेतील महायुतीतील नेत्यांच्या येतात. ते महिलांचा विरोध आणि द्वेष करतात. महिला पुढे आलेल्या त्यांना सहन होत नाही. त्यामुळे सतत महिलांविरोधात जी विधाने येतात त्यात सातत्य आहे. त्यात हे त्यांच्या वैचारिक बैठकीत फरक नाही. असेही सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. यावर सविस्तर बोलताना सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, आचारसंहितेमुळे कुठलाच निधी मिळाला नाही. निकाल लागून २ आठवडे झाले, त्यात संसदेचं अधिवेशन आहे. बारामतीतल्या रस्त्यासाठी मी नितीन गडकरींची भेट घेतली. अनेक विषयांवर मंत्र्यांच्या भेटीगाठी घेतल्या. महाराष्ट्रातील शेती, रस्ते आणि रेल्वे प्रश्नावर मविआचे खासदार मंत्र्यांना भेटले. महाराष्ट्रातले प्रश्न लवकरात लवकर सुटावे यासाठी प्रयत्न आहेत. असे सुप्रियाताई सुळे यांनी सांगितले आहे. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, नीट ( NEET ) पेपर फुटीवर आम्हाला सविस्तर चर्चा हवी होती. देशातील कुठल्याही स्पर्धात्मक परिक्षेत आज प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. पुढच्या पिढीसाठी नोकऱ्या नाहीत. स्पर्धात्मक परिक्षेतून मेरिटवर कुणाला घेतले जाणार नाही. त्यामुळे नीटवर सविस्तर चर्चा व्हावी अशी मागणी होती. सरकारकडून देशाला उत्तर मिळालं नाही. राजकारण बाजूला ठेवून नीटसारख्या गंभीर आणि संवेदनशील विषयावर चर्चा व्हायला हवी होती परंतु ती झाली नाही. असेही सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, आम्ही सध्या पुण्यात आहोत - पुणे पोर्शे प्रकरणाचे काय झाले? पोर्शे हिट-अँड-रन प्रकरणात, रक्ताच्या नमुने बदल महाराष्ट्रात असे कधीही घडलेलं कधी ऐकले आहे का?. ललित पाटील प्रकरणाचे काय झाले? गेल्या आठवड्यात केवळ धंगेकर यांच्यामुळे काही कारवाई झाली आहे.

## चंद्रशेखर राव यांना धक्का

आधुनिक केसरी

तेलंगणातील भारत राष्ट्र समितीच्या (बीआरएस) ६ विधानपरिषदेच्या आमदारांनी गुरुवारी रात्री काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे भारत राष्ट्र समितीचे प्रमुख आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांना मोठा धक्का बसला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या उपस्थितीत बीआरएसच्या या सहा आमदारांनी पक्षप्रवेश केला आहे. गेल्या वर्षी तेलंगणामध्ये विधानसभेची निवडणूक झाली होती. या निवडणुकीत के.चंद्रशेखर राव यांच्या बीआरएसला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. तेलंगणातील विधानसभेच्या निवडणुकीनंतर के.चंद्रशेखर राव यांना धक्यावर धक्के बसत आहेत. आता बीआरएसमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या आमदारांमध्ये दंडे विठ्ठल, भानू प्रसाद राव, एमएस प्रभाकर, बसवाराजू सरैया, बोग्गारापू दयानाद आणि येगे मल्लेशम यांचा समावेश आहे. या आमदारांच्या काँग्रेसमधील पक्ष प्रवेशावेळी काँग्रेसच्या प्रभारी दीपा दास मुंशी यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. दरम्यान, तेलंगणा विधानपरिषदेत बीआरएसचे २५ सदस्य आहेत. मात्र, बीआरएसच्या विधानपरिषदेतील ६ आमदारांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे काँग्रेसची ताकद आणखी वाढली आहे. विधानपरिषदेतील काँग्रेसच्या आमदारांची संख्या चारवरून आता दहावर पोहचली आहे. माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांचे विश्वासू समजले जाणारे केशव राव यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. केशव राव हे राज्यसभेवर खासदार होते. मात्र, काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर केशव राव यांनी खासदारकीचा राजीनामा दिला असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर होते. दिल्ली दौऱ्यावरून तेलंगणात दाखल झाल्यानंतर गुरुवारी रात्री बीआरएसच्या सहा आमदारांनी मध्यरात्रीच काँग्रेसमध्ये प्रवेश केला. के.चंद्रशेखर राव हे दोन पंचवार्षिक सत्तेत राहिले. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत बीआरएसचा दारुण पराभव झाला. बीआरएसला ११९ पैकी फक्त ३९ जागा मिळाल्या होत्या. त्यामधूनही निवडणुकीनंतर काही आमदारांनी बीआरएससोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केला होता. यानंतर आता विधानपरिषदेतील सहा आमदारांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे बीआरएस पक्षासाठी हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

## महाकवी कालिदास : काव्य-नाट्य साहित्याचा स्वामी



श्रावण सखुबाई रंगनाथराव भवर
संपर्क क्र. 9421932704

आधुनिक केसरी

**शब्द साधनेचा पुजारी हा शब्दा खातीर जगत असतो. शब्द आणि त्यातील भाव हेच त्याच्या जीवनाचा विभाज्य भाग असतात. शब्द साधना ही मानवी तन मन आणि समस्त समाज जीवनाच्या उत्कर्ष,उन्नती आणि उद्धाराचा मुलाधार आहे जे जे या शब्दांची साधना मनोमन मनोभावे आणि महत प्रयत्नाने करतात ते आपल्या जीवन उद्दिष्टांच्या शिखरावर विराजमान होतात आणि जन माणसांना सदा सर्वदा आणि सर्वकाळ अनन्य आनंद देत असतात. आपल्या कार्य कर्तुत्व आणि कर्तबगारीने इतिहासाच्या पाना पानावर आणि समस्त विश्वातील समाजाच्या मनामनात कायम घर करून राहतात.**



शा लोकांच्या मनात कायम घर करून राहणाऱ्या लोकांना स्थळ काळ वेळेची मर्यादा नसते ते सदा सर्वदा समकालीन आणि सदाबहार असतात. काळाच्या वेळेचा ओघ त्यांच्या कार्यकर्तुत्वाच्या ठसा काळाच्या पडद्यामागे देऊ शकत नाही . ते कायम काळाच्या स्वारीवर स्वार असतात.काळ, वेळ कितीही उलटला, सरला तरीही त्यांच्या आठवणी, त्यांचे कार्य हे सदैव काल सुसंगत रते. असेच,सदा सर्वदा, समकालीन आणि काल सुसंगत असलेलं थोर व्यक्तिमत्व म्हणजे महाकवी कुलगुरू कालिदास होय.

कालिदास हे नाव जरी उच्चारलं तरी काव्य नाट्य साहित्य क्षेत्राची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्यांनी लिखित अचाट, अफाट अलौकिक आणि अद्वितीय महाकाव्य, महा नाट्य आणि अलौकीक अनन्य आणि अविस्मरणीय साहित्य निर्मितीचे दर्शन होते. काव्य नाट्य कला साहित्य क्षेत्रातील स्वामी असलेल्या कालीच्या या दासाने संस्कृत भाषेतील साहित्य समस्त साहित्य क्षेत्रात अजरामर झाले आहे.

संस्कृत भाषेतील महाकाव्य निर्मितीच्या मांदियाळीत अग्रणी असलेले महर्षी व्यास आणि महर्षी वाल्मिकी नंतर महाकवी कालिदासाचे अढळ, अचल आणि अग्रणी स्थान आहे.

आषाढस्य प्रथम दिवसे अर्थात आषाढ (आखाड) महिन्याचा पहिला दिवस हा महाकवी, कुलगुरू कालिदासांचा जन्मदिन म्हणून समस्त भारत वर्षासह जगभर साजरा केला जातो.

संस्कृत महाकवी कालिदास यांच्या जन्माचा नेमका काळ कोणता आणि ठळक नोंदी बाबत लेखक, संशोधक आणि अभ्यासकांची वेगवेगळी मतं आहेत. परंतु, महाकवी कुलगुरू कालिदास यांनी जन्माला घातलेल्या साहित्याची नोंद, दखल भारत वर्षातच नाही तर समस्त विश्वात दाखल झालेली आहेत. पूर्वाश्रमीचा अक्षरशत्रू ,अडाणी, अज्ञानी आणि गतिमंद पण, सुंदर, देखणा आणि राजबिंड असलेल्या या गवळी चा तत्कालीन विद्वान राजकन्या विद्योत्तमा सोबत फसवणूक विवाह होतो. विद्वान राजकन्या विद्योत्तमाला आपली फसवणूक झाल्याचे कळते आणि कालिदासाचा अपमान करुन त्यांना अपमानित करते. विद्वान राजकन्या विद्योत्तमा चे अस्ति कश्चित् वाग्विशेषः? अर्थात आपल्या जीवनात आणि वाणीत काहीच विशेष नाही. आपलं जगणं आणि बोलणं अर्थहीन आहे. राजकन्येचे विखारी आणि विषारी शब्द कालिदासांच्या जिव्हारी लागतात आणि ते स्वतःला सिद्ध करण्यासाठी अविरत, अथक, अविश्रांत अपार अफाट आणि अतोनात महेनत घेतात आणि स्वतः ला प्रचंड विद्वान पंडित म्हणून सिद्ध करतात आणि कालांतराने प्रसिध्द होतात.

अस्ति कश्चित् वाग्विशेषः? या मानला प्रचंड घाव, वेदना आणि त्रास देणाऱ्या तिन शब्दांच्या वापर करून या तीन शब्दांनी सुरु होणारी तिन महान महाकाव्य कालिदासांनी लिहिली.जे शब्द वर्मी लागले होते, त्याच शब्दांची वर्दी करून महाकाव्य निर्माण करण्याचा भीमपराक्रम महाकवी कालिदास यांनी केला. महाकाव्य कुमारसंभव ची सुरुवात अस्ति या शब्दाचा वापर करून अस्त्युत्तरस्याम् दिशि देवातात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ने केली, तर महाकाव्य मेघदूतम् ची सुरुवात कश्चित् कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमतः। या कडव्याणे केली आहे. तर वाग्विशेषः या शब्दाचा वापर करून महाकाव्य रघुवंशम् च्या सुरुवातीस केला आहे. वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिप्रत्तये । जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥ फसवणूक केलेल्या राजकन्येचे तीन शब्द अस्ति कश्चित् वाग्विशेषः? जिव्हारी लागले आणि महाकवी कालिदासांनी जवळपास तिस साहित्य काव्यांची निर्मिति केली. त्यातील मेघदूतम् म्हणजे सदासर्वदा समकालीन आणि प्रेमीयुगुलांची मनो व्यथा अन् विरह कथा असलेलं प्रेमाचं महाप्रेम काव्यचं आहे. यक्षपती कुबेराच्या शिक्षेनुसार गुह्यक नामक यक्षाची अलकापुरीतून रामगिरी नामक पर्वतावर हकालपट्टी केली जाते. पत्नीप्रेमापासून दूर पाठविलेल्या या यक्षाला पत्नी विरह सहन होत नाहीं आणि आपल्या प्रेमाच्या आठवणीत तो आभाळातील मेघांनी दूत बनून अलका नगरीस्थित माझ्या प्रियासीला माझ्या विरह यातना कळव सुख समाचार तिला कळव अशी याचना करतो. यक्ष आभाळातील मेघांनी दूत बनून यापरिस्थितीने दुरावलेल्या प्रेमी युगुलांचा एकमेकांचा मनोदय, मनोभाव कळविण्याची प्रार्थना करतात. प्रेम, विरह, पुनर्मिलनाची आतुरता आणि प्रचंड ओढ अशा अनेक प्रेम प्रेमिकेच्या मनातील अवस्थांचा आविष्कार, साहित्य क्षेत्रातील अजरामर प्रेम कहाणी म्हणजे मेघदूत.

असाच पद्धतीने संस्कृत साहित्यात मेघदूतम्,अभिज्ञान शाकुंतलम् , विक्रमोवंशीय,ऋतुसंहार, कुमारसंभवम्, रघुवंशम्, मालविकाग्निमित्रम हे सात काव्य रत्न सदा सर्वदा सर्वकाळ अजरामर आहे. महाकवी, कुलगुरू कालिदासांच्या संस्कृत साहित्याचे अनेक भाषांत भाषांतरे अनुवाद झालेली आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिं.द्वा. देशमुख, रा.ची. श्रीखंडे, ना.ग. गोरे, बा.भ. बोरकर, कुसुमाग्रज, वसंत बापट व शांता शेळके आदी महान साहित्यिकांनी कालिदासाच्या साहित्याचे मराठीत अनुवाद केलें आहे.. कालिदासाच्या सर्वकाळ समकालीन असलेलं साहित्य वैश्विक स्तरावर ही कीर्तीमान आणि बहुमान प्राप्त आहे. सर् विल्यम जोन्स यांनी कालिदासाची भारताचा शेक्सपिअर अशी पदवी बहाल केली आहे.. संस्कृत साहित्य क्षेत्रील भारतभूच्या या मुकूटमणी अर्थात महाकवी कुलगुरू कालिदास. यांचा च जन्म दिन हा आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी समस्त विश्वात साजरा केला जातो.. महाकवी कुलगुरू कालिदास यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, साहित्य भारती आणि श्रमशक्ती कला आविष्कार यांच्या विद्यमाने आषाढस्य प्रथम दिवसे... निमित्त महाकवी कालिदास दिन- जयंती निमीत्त नाट्यरुपी अभिवादन..

## भंपक युगात स्वार्थाचा बोलबाला



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सध्याच्या युग भंपक असल्याने स्वार्थाचा बोलबाला निर्माण झाला असून खरा निष्ठावान उपाशी तर तोतया मात्र तुपाशी आहे.सगळ्याच क्षेत्रात खरी माणसं दुर आहेत पण जि माणसं क्षणिक मळभ निर्माण करुन गवगवा करतात तिचं सगळ्यात जास्त लाभानवित असतात.लाभ संपलं क्षणिक निष्ठा संपली हा नवीन अध्यया म्हणजे तोतया निष्ठावंत निष्ठावान असंच काहीसं सध्या तरी चालेल आहे.स्वार्थ आणि निष्ठा हे कधीच एकत्र नसतात मतलब स्वार्थ ठेवून निर्माण झालेला आदर निष्ठा नाही तर वेळेनुसार तात्पुरत्या स्वरूपात स्वार्थ लाभ मतलब आहे तोपर्यंत अथवा तो साधे पर्यंत फक्त घनिष्ठता दाखविण्याचा प्रयत्न असतो त्याला निष्ठा हे नामकरण केलं जातं पण वास्तविक हा निष्ठा या शब्दाचा अवमान आहे.मुळात निष्ठा हि निस्वार्थ असते.**

पण सध्या निष्ठेचा व्यापार चरण सिमेवर असुन जितका मतलब तितकी आणि तोपर्यंतच निष्ठा हा नवीन निष्ठेचा प्रकार अस्तित्वात आला आहे.खरा निष्ठावंत हा नेहमीच उपशी असतो.सृष्टीवर अस्तित्वात असणार्या सर्वच क्षेत्रात आणि वेगवेगळ्या व्यवहारातील संबंधात खरा हा दुर असतो.तर नकली हा नेहमीच जवळीक साधुन लाभ करून घेऊन पुन्हा शत्रू यादीत समाविष्ट होतो.हे सध्याच्या काळातील निष्ठेच्या व्यापारातील फार मोठ वास्तव आहे.नाव फक्त निषठेच आहे.पण त्या अडुन व्यापार चालु आहे.कोण गृहक? कोण व्यापारी ?हे गुपित उशिराने कळते हेच या व्यापारातील गमक आहे. पण तो पर्यंत खरा निष्ठावान हा अक्षरशः पायदळी तुडवला जातो. परंतु खरा निष्ठावान हा या व्यापाराचा घटक नसल्याने तो सदैव आत्मियतेने निष्ठावान च असतो.सध्याच्या काळात प्रत्येक क्षेत्रात आपण किती निष्ठावान आहेत हेच दाखवण्याचा प्रयत्न सगळ्यांचं क्षेत्रात होत आहे.पण या निष्ठे आड स्वार्थ नसेल तर अभिनंदनच आहे.निष्ठे आड जर स्वार्थ असेल तर मग ती निष्ठा कसली तो चक्क व्यापार आहे.हल्ली निष्ठा हि कशी मोजायची हाच खुप मोठा गहण प्रश्न आहे.स्वार्थ किंवा विशिष्ट हेतूने प्रेरित होउन आपल्या सोबत जोडला गेलेला व्यक्ती हा निष्ठावंत या गोंडस नावाखाली आपल्या सोबत असतो.खरा पण तो आत्मियतेने कधीचं आपला नसतो.हि बाब आपल्याला कळत नाही कि कळुन वळत नाही अथवा हा वेळेचा प्रभाव आहे.हे मात्र वेगळं गणित आहे.जस गुळाची ढेप आहे तोपर्यंतच मुंगळे असतात.आणि ढेप संपली कि ते दुसरी ढेप शोधतात.या मध्ये मुंगळयांचा दोष अजिबात नाही.ते ढेपी शिवाय राहु शकत नाहीत.आणि नविन ढेप शोधण्यासाठी निष्ठावंत होण्याशिवाय पर्याय नसतो.महणुनच तर मी खूप निष्ठावान आहे. हे वरकरणी दाखवून द्यावे लागते . म्हणुन च स्वार्थासाठी निष्ठावंत होणारांचा सगळीकडे बोलबाला आहे. असंच चित्र आपण सध्या सर्वत्र पाहतोय.मात्र आपल्या स्व स्वार्थासाठी क्षणिक निष्ठावंत होऊन स्वतःला आणि ज्यांच्या साठी आपण क्षणिक निष्ठावंत होऊ त्यांना देखिल अंधारात ठेवण म्हणजे आपण आपल्या स्वतःलाच कुठेतरी फसवतोय.पण हे कळण्याची समज आणि उमज हि त्या क्षणाल आपल्याकडं नसते.म्हणून आपल्याला आपण आपण केलेल ते कृत्य त्या तात्कालिक क्षणी योग्य आहे.असंच काहिस वाटतं असत.परंतु अशा पद्धतीने स्वार्थासाठी निष्ठावंत होण्यापेक्षा दुर्लक्षित एकनिष्ठ असलेल कधींही उत्तमच नैसर्गिक न्यायाला धारूण आणि आत्मिक दृष्या योग्य आणि समाधान कारक समाधान देणारं असत.नात्या पासुन गोत्या पर्यन्त, व्यापारा पासुन उदयोगा, पर्यन्त समाजकारण पासुन, राजकारणा पर्यन्त ,कले पासुन क्रिडे पर्यंत जवळपास सगळ्याच क्षेत्रात जो प्रामाणिक आहे.निस्वार्थी निष्ठावंत आहे.तो दुर्लक्षित आहे हे अगदी वास्तव व कटु सत्य असुन जो स्वार्थी आहे तो अगदी तळहातावर आहे. त्याचा सगळीकडेच बोलबाला आहे . हे प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक संबंधात नात्या मध्ये स्वार्थी आणि संधी साधु निषठवंताचा बोलबाला झाला आहे . त्यामुळे खरे प्रमाणिक निस्वार्थी निष्ठावंत पायदळी तुडवले जातात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# डॉ. राजू पाटोदकर रोटरी क्लब ऑफ पुणे रॉयलच्या सेवा उत्कृष्टता रोटरी पुरस्काराने गौरवान्वित

## कोणत्याही सामाजिक उपक्रमासाठी रोटरी सदैव अग्रेसर : नियोजित प्रांतपाल रो. संतोष मराठे

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** कोणत्याही सामाजिक उपक्रमासाठी रोटरी सदैव अग्रेसर असून रोटरीची सेवाभाव ही १२० वर्षांची उज्वल परंपरा आहे आणि हीच परंपरा पुणे येथील सर्व रोटरी क्लब समर्थपणे पुढे नेत आहेत, असे प्रतिपादन,नियोजित प्रांतपाल रो.संतोष मराठे यांनी काल येथे केले. रोटरी क्लब ऑफ पुणे रॉयलच्या नूतन पदाधिकारी पदग्रहण समारंभ व सेवा गौरव पुरस्काराच्या वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी क्लबच्या नवनिर्वाचित अध्यक्षा रो.आरती प्रशांत देशपांडे तसेच सचिव रो. वृषाली गिरीश देशपांडे, माजी अध्यक्ष रो.उदय कुलकर्णी चार्टर्ड अध्यक्ष रो. प्रशांत देशपांडे तसेच रोटरीचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

जगभरात रोटरी क्लबच्या माध्यमातून, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्यासाठी विविध उन्नतीचे उपक्रम राबवले जातात. सामाजिक प्रगतीसाठी रोटरीचे मोठे योगदान असल्याचे मराठे यावेळी म्हणाले.

व्यावसायिक व सेवा उत्कृष्टता रोटरी पुरस्कार या कार्यक्रमात माहिती उपसंचालक पुणे ,डॉ. राजू पाटोदकर, एसआरईपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.रामचंद्र कड, तसेच डॉ. मनीषा आणि डॉ. अभिजीत सोनवणे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र ट्रॉफी असे याचे स्वरूप आहे. या कार्यक्रमाच्या प्रारंभी रो.आरती प्रशांत देशपांडे यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे रॉयल च्या अध्यक्षपदाची तर रो. वृषाली गिरीश देशपांडे यांनी सचिवपदाची सुत्र स्वीकारली. क्लबचे बोर्ड ऑफ डायरेक्टर मेधा कुलकर्णी, डॉ. योगेश खंडाळकर, गिरीश देशपांडे, अजय चौधरी, श्रीनिवास जन्नू, अरुण शिंदे, शाम टेकाळे, शांतीकुमार मनसबदार व प्रशांत देशपांडे यांचाही सन्मान करण्यात आला. अध्यक्षा रो.आरती यांनी आगामी वर्षात राबविल्या जाणाऱ्या वैविध्यपूर्ण उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. या समारंभात गतवर्षी रोटरी क्लब ऑफ पुणे रॉयलच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करणारे पदाधिकारी यांचाही सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे क्लबमध्ये नव्याने सभासद झालेल्या अलोक झा, शुभम पाटील, योगेश वीर, नीलिमा यादव, माधुरी निटूरकर, डॉ, रविंद्र निटूरकर, वैशाली वेडे- पाटील, पुनम चौधरी, गणेश कुटे व अमोल चाफेकर या दहा नूतन सभासदांचे स्वागत करण्यात आले. तरवडे क्लार्क्स इन हॉटेल, पुणे येथे आयोजित या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्लबच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.पुनम चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन रो.मेधा कुलकर्णी यांनी केले.

# प्राचार्य नारायण कोलते पाटील यांनी केले पाचवीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छाने स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा येथील विद्यार्थ्यांचे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी मध्ये घवघवीत यश संपादन केले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा शाळेचे सहा विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते त्यापैकी चार विद्यार्थी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीमध्ये येऊन शिष्यवृत्ती मिळण्यासाठी पात्र ठरले आहे.छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातून जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा सावळदबारा शाळेची विद्यार्थिनी कु. दिव्या दीपक सूर्यवंशी हीचा 81.87% गुणांसह जिल्हा गुणवत्ता यादीत 11व्या क्रमांक आला . तर कुमारी कविता कैलास शिप्पलकर हीचा 79.86% टक्के गुणांसह जिल्ह्यात 25 व्या क्रमांक , कुमारी खुशी सुभाष परसे हीचा 79.19% जिल्ह्यात 32 व्या तर साहिल युसुफ तडवी याचा 72.48% गुणांसह जिल्हा यादीत 225 व्या क्रमांक पटकावला यांप्रसंगी शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य नारायण कोलते पाटील व मुख्याध्यापक विठ्ठल राठोड यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल राठोड सर , वर्ग शिक्षक श्री भागवत गायकवाड, निता हिरास मॅडम , गजानन गवई सर, अनिल चव्हाण सर , मदन मुठाळ सर या सर्वांच्या प्रयत्नातून आज हे यश मिळाले. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.केंद्र प्रमुख श्रीमती एस.बी. राठोड मॅडम यांनी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.तसेच वर्ग शिक्षक गायकवाड सर यांचे सुद्धा स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परमेश्वर इंगोले यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मराठवाडारत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**हिंगोली :** सेनगांव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथील रहिवासी असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल दिनांक 3 जुलै रोजी दुपारी 1 वाजता मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाला. सिंधू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंधारवाडी तर्फे हा पुरस्कार परमेश्वर इंगोले यांना जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण 14 जुलै रोजी महावीर भवन हिंगोली या ठिकाणी करण्यात येणार आहे. शेतकरी,बेरोजगार युवक,दिव्यांग बांधव,निराधार,विधवा महिला यांच्यासाठी सदैव सामाजिक कार्य करत त्यांना उभारी देण्यासाठी प्रयत्न केले. या विशेष उल्लेखनीय कार्यासाठी परमेश्वर इंगोले यांना मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. जवळा बुद्रुक सारख्या अतिशय दुर्गम भागातील गावापासून समाजकार्याला सुरुवात करून त्यांनी नेहमी शेतकरी,गोरगरीब,कष्टकरी व बेरोजगारांच्या प्रश्नाला वाचा फोडली असून त्यांना आता हा मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाल्याने सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# स्वामी विवेकानंद यांना विनम्र अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे युगप्रवर्तक छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थाद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथी निमित्ताने पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.अर्चना कहाळे पत्की, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ भारत माता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली. स्वामी विवेकानंदांच्या जीवनात त्यांच्या गुरूंचे म्हणजेच श्री रामकृष्ण परमहंस यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते स्वामी विवेकानंद म्हणतात, की श्री रामकृष्ण परमहंस माझ्या जीवनाचा ध्रुवतारा आहे. माझ्या विचाराने ,कृतीने,शब्दाने जर मी काही साध्य करू शकलो असेल किंवा एखाद्या शब्दाने जरी कोणाचे भले झाले असेल तर ती खरी त्यांचीच किमया आहे. त्यामुळे आपण सदैव आपल्या गुरुप्रती ऋणी असले पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. अर्चना कहाळे पत्की यांनी आपल्या अध्यक्ष मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन प्रा. सचिन देशमुख यांनी केले. संस्थेचे संचालक डॉ. मारोती वाघ आणि संचालिका सौ. लता वाघ यांचे या कार्यक्रमाला मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक वृंदांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

# चंद्रपुरात लोहखनिजावर आधारित उद्योग सुरू करा : आ. किशोर जोरगेवार

## अधिवेशनात बोलताना केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वित्झरलॅंड च्या दावोस मध्ये तीन लाख कोटी पेक्षा अधिकचे एमओयू साइन केले आहेत. यातील अनेक उद्योग राज्यात येत आहेत. चंद्रपूर लगतच्या सुरजागड येथेही लोहखनिज प्रकल्प आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीसाठी चंद्रपूरात लोहखनिजावर आधारित उद्योग सुरू करण्यात यावे, अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. मुंबई येथे सुरू असलेल्या अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी रोजगार निर्मितीसाठी चंद्रपूर येथे नवे प्रकल्प येण्याची गरज व्यक्त केली आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा हा वीज उत्पादक जिल्हा असून भारताच्या मध्यभागी आहे. रेल्वे कनेक्टिव्हिटी, एअर कनेक्टिव्हिटी आणि रोड कनेक्टिव्हिटी असलेला हा जिल्हा आहे. येथे विपुल प्रमाणात जमीन, कोळसा आणि वीज आहे. त्यामुळे सुरजागड येथे मिळालेल्या लोहखनिजावर आधारित विविध स्टील उद्योग या जिल्ह्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. महिलांसाठी चांगली योजना सरकारने आणली आहे. त्यातच सरकार विधवा, निराधार, परित्यक्ता अशा 10 हजार महिलांना पिंक रिक्षा देणार आहे. मात्र खनिज निधीमधूनही सदर रिक्षा खरेदी करण्याचे प्रावधान करण्यात यावे, अशी मागणीही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. चंद्रपूरला घोषित झालेल्या टायगर सफारीचे काम गतीशील करण्यात यावे, अशी मागणीही जोरगेवार यांनी केली आहे.

# हडपसर भागात पुन्हा कोयता गँगची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हडपसर भागात टोळक्याकडून दहशत माजविण्याचे प्रकार वाढीस लागले आहे. टोळक्याने संकेत विहार सोसायटी परिसरात कोयते उगारून वाहनांची तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी चार ते पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मारुती तात्यासाहेब काळोखे (वय ३१, रा. दिव्याश्रय सोसायटी, संकेत विहार, फुरसुंगी, हडपसर) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संकेत विहार सोसायटी परिसरात गुरुवारी मध्यरात्री टोळके आले. शिवीगाळ करून त्यांनी नागरिकांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. टोळक्याने कोयते उगारून वाहनांच्या काचा फोडण्यास सुरुवात केली. काळोखे यांनी हा प्रकार पाहिला. त्यांनी तोडफोड करणाऱ्या आरोपींना जाब विचारला.

# आषाढस्य प्रथम दिवसे


आधुनिक केसरी



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

**आज आषाढाचा पहिला दिवस आहे आणि मला महाकवी कालीदासांच्या या ओळी आठवत आहेत, आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानु वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श।। - महाकवि कालिदास (मेघदूतम्) महाकवी कालिदासाने जेव्हा आषाढाच्या पहिल्या दिवशी आकाशात दाटून आलेले काळे मेघ बघितले तेव्हा त्यांच्यातील प्रतिभेने भरारी घेतली आणि मेघदूत या महाकाव्याच्या रूपाने त्यांनी यक्ष आणि मेघ यांच्या माध्यमातून विरहामुळे वाट्याला येणारी व्यथा सुंदर रीतीने मांडली.**

महाकवी कालिदासांनी रचलेल्या 'मेघदूतम्' या महाकाव्यात याचे फार सुंदर वर्णन केलेले आहे. हे खंडकाव्य पूर्वमेघ आणि उत्तरमेघ या दोन भागांमध्ये विभागलेले आहे. पत्नीविरहामुळे व्याकुळलेल्या एका यक्षाने स्वतःच्या पत्नीला मेघाबरोबर पाठवलेला संदेशाच्या कल्पनेवर मेघदूत आधारले आहे.
आषाढाच्या पहिल्या दिवशी डोंगराच्या शिखरावर वाकलेल्या मेघाला पाहून पत्नीच्या विरहाने व्याकूळ झालेल्या यक्षाला असे वाटले, जणू एखादा हत्ती क्रीडेमध्ये रममाण आहे.
मेघदूत या महाकाव्याचा नायक (यक्ष) हा अलका नगरीत राहणाऱ्या यक्षराज कुबेराचा एक सेवक होता. यक्षाला कुबेराने पूजेसाठी सूर्योदयापूर्वी हजार कमळं आणून देण्याची जबाबदारी दिलेली. आधीच हिमालय त्यात पहाटेची वेळ आणि यक्षाचं नवीन लग्न झालेलं. आपल्या पत्नीच्या सहवासात रमल्यामुळे



त्याला नेमून दिलेल्या कामात त्याच्याकडून हलगर्जीपणा झाला. त्यामुळे त्या यक्षाला, यक्षराजाने (कुबेराने) एका वर्षासाठी हद्दपारीची शिक्षा फर्मावली. हद्दपारीचे ठिकाण अलका नगरीहून फार दूर अंतरावर असलेला 'रामगिरी' पर्वत हे होते. त्या ठिकाणी बरेच महिने पत्नीपासून दूर राहिला असताना वर्षाऋतू सुरू झाला. तेव्हा त्या यक्षाच्या मनोवृत्ती एकदम उचंबळून आल्या आणि त्याला पत्नीची तीव्रतेने आठवण होऊलागली. त्या निर्जन प्रदेशात यक्षाला सजीव आणि निर्जीव याचेही भान राहिले नाही. त्यामुळे त्या यक्षाने मेघालाच दूत कल्पिले आणि आपल्या पत्नीला निरोप सांगण्याचे काम त्याच्यावर सोपविले. प्रथम रामगिरीपासून अलका नगरीपर्यंत जाणाऱ्या मार्गाचे रसभरित वर्णन त्याने केले. त्या मार्गात जे जे पर्वत येणार आहेत, त्यांचे वर्णन करून त्या पर्वतांवर थोडी विश्रांती घेऊन पुढे जातांना ज्या नद्या मार्गामध्ये येणार आहेत त्यांचे वर्णन केले आणि त्या नद्यांचे पाणी प्राशन करून पुढील मार्गक्रमण करायला त्या यक्षाने त्या मेघाला सांगितले. मार्गामध्ये येणाऱ्या गावांचे आणि शहरांचे वर्णन करून त्या गावांवर आणि शहरांवर थंड पाण्याचा शिडकावा करण्याचेसुद्धा त्या मेघाला सांगितले. उज्जयिनी, विदिशा, दशपूर इत्यादी शहरे; ब्रह्मावर्त, कनखल इत्यादी तीर्थ तसेच वेत्रवती, गम्भीरा इत्यादी नद्या पार करून मेघाने हिमालय आणि त्यावर वसलेल्या अलका नगरीपर्यंत पोहचण्याची कल्पना यक्षाने केली. करुणरसाने ओथंबलेला असा संदेश प्रियेस सांगून "प्रियेचे शुभवर्तमान मला परत येऊन सांग" असे त्या मेघास सांगून यक्षाने मेघाची अलकानगरीकडे रवानगी केली. उत्तरमेघामध्ये अलकानगरी, यक्षाचे घर, त्याची प्रिय पत्नी आणि प्रियेसाठी त्याचा संदेश ही विषयवस्तु येते.



## एकनाथ महाराज अन्नछत्रालयाच्या वतीने खासदार संदिपान भुमरे यांची लाडूतुला

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्याचे भुमिपुत्र तथा आमदार संदिपान भुमरे यांनी संभाजीनगरच्या खासदार पदी बहुमताने निवड झाल्यावर पैठण तालुक्यातील खासदार होणारे पहीले व्यक्तीमत्व असल्याने शुक्रवार दि,5 रोजी पैठण येथे जाहीर नागरी सत्काराचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी संत एकनाथ समाधी मंदिरात हरिकृपा सेवा समिती संचलित संत एकनाथ महाराज प्रसादालयाच्या वतीने लाडु तुला करण्यात आली. खासदार संदिपान भुमरे हे संत एकनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष आहेत. याप्रसंगी संत एकनाथ महाराज प्रसादालयाचे अध्यक्ष सतिष उदावंत व सेवेकरी यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी अंकुश सेलुकर, भगवान मिटकर, शिवाजी कोलते, सर्जेराव सोनवणे, विठ्ठल परदेशी, गणपत मिटकर लक्ष्मण लाड, जगन्नाथ काकडे, मारोती मोमेडवार, अंकुश म्हस्के, जिजा मिसाळ, अर्जुन भोसल, पंडितराव औटे, नंदकिशोर जोशी, गुलाब सातपुते, प्रविण उदावंत, मुकुंद ठोसर, लिंबाजी चौधरी, परसराम करडवाल, बाबुराव बोंबले, बाबासाहेब शिंदे, संभाजी गव्हाणे, तुपे मामा, मनोहर नवले यांची उपस्थिती होती.

## सप्तकुंड धबधबा परिसरात रील्सला बंदी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील अजिंठा जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत पावसाळ्याच्या दिवसांत पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असलेला सप्तकुंड धबधबा परिसर हा सुरक्षेच्या कारणास्तव धोकादायक असल्यामुळे याठिकाणी धोकादायक रील्स, सेल्फी अथवा फोटोसेशन करण्यास सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर पोलिसांनी बंदी घातली आहे. अजिंठा लेणी हा परिसर पावसाळ्यातील दिवसांत धबधब्यांसाठी व निसर्गरम्य वातावरणासाठी प्रसिद्ध आहे. निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी या दिवसांत पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. जागतिक वारसास्थळ असलेली अजिंठा लेणी बघण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. याठिकाणी असलेला सप्तकुंड धबधबा हा सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यामुळे या परिसरात जिवाची बाजी लावून कोणीही रील्स, सेल्फी अथवा फोटोसेशन करू नये. संबंधित कोणताही पर्यटक असे कृत्य करताना आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा कडक इशारा. प्रफुल्ल साबळे, सहायक पोलिस निरीक्षक, फर्दापूर यांनी बोलताना सांगितले आहे असते. हिरव्यागार डोंगररांगा, त्यावरून वाहणारे धबधबे आणि खाली उतरणारे ढग अशा विहंगम दृश्यात फोटोसेशन करण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक अजिंठा लेणी येथे येतात; परंतु भावनेच्या भरात उत्साही पर्यटक नको ते धाडस करतात आणि संकटाला आमंत्रण देतात. यापूर्वीही अशा धोकादायक आहे.घटना या परिसरात घडल्या आहेत. सद्यःस्थितीत राज्यात अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सतर्क झाले आहे. सप्तकुंड धबधबा व लेणी परिसरात धोकादायक रील्स तथा फोटोसेशन करण्यास फर्दापूर पोलिस ठाण्याच्या वतीने सक्त मनाई करण्यात आली.

## खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी घेतली मंत्री नितीन गडकरी यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकसभा मतदार संघाच्या खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी मतदार संघातील प्रमुख महामार्गावरील ज्वलंत असलेल्या प्रश्नांवर लक्ष वेधून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन विविध प्रमुख विषयांवर चर्चा करत निवेदन सादर केले. व मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून निवेदनांची दखल घेत लवकरच बैठक लावण्याचे खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांना आश्वासन देण्यात आले. लोकसभा मतदार संघाच्या खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि मतदार संघातील विविध प्रमुख विषयांवर निवेदन सादर केले.
त्यात मुंबई आग्रा रोडवरील मालेगाव तालुक्यातील टेहरे, मुंगसे आणि सौंदाणे या गावांच्या मधून सदरची गावे ओलांडून मुंबई-आग्रा रस्ता अर्थातच NH-3 जात आहे. येथे रस्ता ओलांडताना यापूर्वी अनेक अपघात होऊन गेले असून आजही येथे अपघात होत आहेत यामुळे येथे मोठ्या प्रमाणात मृत्यू आणि आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते. याठिकाणी प्रत्येक गावाच्या क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्याची मागणी करण्यात आली.
दुसरे असे कि, सटाणा (बागलाण) हे अतिशय लहान गजबजलेले शहर असून त्यात रस्ते व पायाभूत सुविधांचा विकास झालेला नाही आणि त्यात लहान मोठी अतिक्रमणे असून त्यामुळे या शहरात वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत असते. या शहराला बाह्य रिंगरोडची आवश्यकता असून येथेच सटाणा (बागलाण), नाशिक- सटाणा रोड, मोरेनगर ते पिंपळनेर साक्री रोड मालेगाव- सटाणा रोड ते पिंपळनेर साक्री रोड बायपास रस्त्याची मागणी देखील यावेळी करण्यात आली.
सदरचा प्रश्न हा गेल्या 10 वर्षांपासून प्रस्तावित व प्रलंबित असून याला चालना मिळणेकामी आपण लवकरात लवकर बैठक लावण्याचे देखील सांगण्यात आले. धुळे मतदारसंघातील (महाराष्ट्र) मालेगाव हे प्रमुख शहर आहे. त्याच्या बाहेरील बाजूने, मुंबई-आग्रा महामार्ग- NH3 जातो. तथापि, याच्या दोन्ही बाजूंना सेवा रस्ते नाहीत कारणास्तव येथे ४०० च्या वर अपघात झाले असून त्याहून अधिक लोक मृत्यू मुखी पडले आहेत. त्यामुळे सेवा रस्ते बांधणे ही आपत्कालीन परिस्थिती असून मालेगाव शहर बाह्यवळण खास करून चाळीसगाव फाटा ते चंदनपुरी गावालगतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला सेवा रस्ते उपलब्ध करून द्यावेत असे निवेदन देखील सादर करण्यात आले.
यात महत्वाचे धुळे ग्रामीण मतदारसंघात महामार्गाचे काम सुरू आहे. या धुळे ग्रामीण मतदार संघात NH- 6 नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्गावर मुकटी-वेल्हाणे येथील भिरडाई गाव शिवारात अंडरपास तसेच धुळे शहराच्या सुरवातीला लागून असलेल्या फागणे-काळखेडा रस्त्यावर देखील अंडरपास बांधावा अशी अनेक वर्षापासूनची स्थानिक जनतेची मागणी आहे. याच महामार्गला लागून असलेल्या NH-52 (जुना NH-211) महामार्गावर NHAL मार्फत धुळे सोलापूर या महामार्गाचे चौपदरी करणाचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. या महामार्गावर तरवाडे गाव आणि शिरूड ते विंचूर फाटा हि गावे दुतर्फा वसली असून दोन्ही बाजूला रुग्णालय, शाळा इ. असल्याने शाळकरी मुलांची आणि गावातीळ जनतेची सुरक्षितता पाहता येथील सर्व्हिस रोडवर अंडरपासची तरतूद करण्यात यावी अश्या विविध विषयांवर लक्ष वेधून वरील आशयाचे निवेदन धुळे लोकसभा मतदार संघाच्या खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथे भेट घेऊन सादर केले. यावर सकारात्मक प्रतिसाद देत निवेदनांची दखल घेऊन लवकरात लवकर बैठक लावण्याचे आश्वासन खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांना मंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहे.



## लाडकी बहीण योजनेचा फायदा १००% घ्या; पण बहीण आता हुशार झाली: डॉ. दिलीप मस्के

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** निवडणुकीच्या तोंडावर सत्ता जाते या भीतीपोटी शिंदे, पवार व फडणवीस सरकारने महिलांना आमिष दाखवून मतदान मिळवण्यासाठी नवीन युक्ती आखली.
बहिणीच्या विरोधात बायकोला उभा करणारा व्यक्ती अजित पवार ज्याला बायको निवडणुकीत पडल्यावर बहिणीची माया जागी झाली. या सरकारला निवडणुकीच्या तोंडावरच का लाडकी बहीण आठवली. शक्यतो भावाला



बहिणीचे लग्न झाल्यावर जशी वाटणी करताना ना हरकत किंवा चोळी बांगडीवर मालमत्ता पाहिजे असती त्याच पद्धतीने या नाकर्ते, भ्रष्टाचारी सरकारला १५००/- रुपयाच्या बदल्यात सत्ता पाहिजे आहे. अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे हिंगोली जिल्हाउपाध्यक्ष तथा कळमनुरी विधानसभेचे नेते डॉ दिलीप मस्के यांनी केली आहे.
गॅस सिलेंडर चे भाव काय...??? मिळणारी सबसिडी कुठे गायब झाली, अन्नधान्याचे भाव काय...??? त्यावर ५% डढ कर लावला, वीज दराचे भाव वाढवले, पाणी पट्टी, घर पट्टी चे भाव वाढवले, पेट्रोल डिझेल चे भाव किती...??? हे सरकार अजून किती पिळवणूक करणार... भाजीपाल्याचे भाव किती, दुधाचे भाव किती...??? अशी कोणती गोष्ट आहे ज्याच्या किंमती मर्यादेपेक्षा वाढल्या आहेत.
लाडकी बहीण आता हुशार झाली आहे.
घरादारात जसा मालकी हिस्सा घेतल्याशिवाय राहत नाही तसाच घेत असलेल्या शिल्लक कराचा हिस्सा घेतल्याशिवाय राहणार नाही.
ज्यांनी योजना जाहीर केली असे हे महाशय सिंचन घोटाळ्यात 70 हजार कोटी रुपयांचे घेटाळेबाज आहेत. जनतेचा पैसा खायचा आणि वर तोंड करून सांगायचे आम्ही योजना आणली. माझ्या माय माऊली ह्या अज्ञान नाहीत. निवडणुका लागल्यावर या भ्रष्टाचारी सरकारला निवडणुकीच्या आखाड्यात तोंडावर पाडल्याशिवाय राहणार नाही, ही जाहीर केलेली योजना फक्त घोषणाच राहील असेच शक्यता वाटत आहे. कारण काही दिवसात आचारसंहिता लागणार आहे. त्यानंतर मात्र सरकार कुणाचे सत्तेत येईल सांगता येत नाही.

# कोपरगाव शहराला भविष्यातही दहा दिवसात पाणी पुरवठ्याची भीती : माजी नगराध्यक्ष मंगेश पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** जुलै महिना सुरू झाला असून २ दिवसापूर्वी नगरपालिकेने ४ दिवसाआड होणारा पाणीपुरवठा १० दिवसाआड केला. काही भागात तर तो १२ दिवसाआड होईल. यामुळे शहरातील महिला भगिनींची अचानक नगरपालिकेने पाण्याच्या दिवसाच्या दिवशी असे पत्र काढल्याने पाणी साठवणुकीसाठी मोठी धावपळ व तारांबळ झाली. सध्या ५ नंबर नवीन साठवण तलावाचे येसगाव येथे काम चालू असून त्याच्या चारही बाजूला काँक्रीटच्या भिंती उभारण्यात आल्या. परंतु या तळ्याच्या तळात माती व प्लास्टिकच्या कागद अस्तरीकरणासाठी टाकला. शासनाने शहराचे पाणी योजनेसाठी १३१ कोटी रुपये मंजूर केले होते. हे पैसे नागरिक जे कर भरतात व पट्टी भरतात यातूनच खरे शासन हे नागरिकांच्या सोयीसाठी हे पैसे देत असतात. यामुळे जनतेवर उपकार केले असे होत नाही. हे शासनाचे कर्तव्यच आहे .खरे तर आपली नगरपालिका कमी पडली शासनाकडे निधी मागण्यासाठी म्हणून आज पर्यंत शहरास पाण्यासाठी माता-भगिनींना, मुलांना नागरिकांना कधी कधी तर महिन्यातून एकदाच पाणी मिळाले असे अनेक वर्ष त्रास हा नागरिकांना केवळ जागा असताना सुद्धा तळे होण्यासाठी प्रयत्न न केल्यामुळे त्रास वर्षानुवर्ष सहन करावा लागला. कोपरगाव शहराची लोकसंख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे .शहराच्या हद्दीमध्ये लगत असलेले छोटे छोटे भाग हे जोडले गेलेले आहेत. त्यामुळे पाण्याची मागणी वाढत चाललेली आहे. त्यामुळे या तळ्याच्या तळ्यात कॉँक्रिटीकरणच व्हायला पाहिजे होते. असे न झाल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याच्या टाकीत पाणी भरल्यानंतर दाब आल्यावर चार चार , पाच पाच किलोमीटर पर्यंत पाणी पाझरून जाणार आहे आणि तळे रिकामी होणार. त्यातच नाशिक भागातील धरणांमध्ये जिथून आपल्याला पाणी येतं तिथे मोठ्या प्रमाणात शहरे वाढत असल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण पडत आहे व आपले पाणी हे कमी होत चालले आहे. धरणातील पाण्यावर आरक्षण पडल्यामुळे शेतीसाठी त्यांना जे पाणी येतं त्याचे रोटेशन लांबत चाललंय .त्यामुळे आपल्याला तळ्यात पाणी मिळणे साठी उशीर होणार आहे आणि पाणी पर्कुलेट झाल्यामुळे पाणीसाठा कमी होणार आणि शहरवासीयांना हे तळे जरी पूर्ण झाली तरी इथून पुढच्या भविष्याच्या ५ , १० , १५ दिवसाआड असेच गढूळ पाणी अस्वच्छ पाणी मिळत राहणार यासाठी नगरपालिकेने अजूनही सप्लीमेंट्री कॉँक्रिटीकरनाच्या निधीसाठी शासन दरबारी तात्काळ प्रयत्न करून तो मिळवावा व कॉँक्रिटीकरण जनतेच्या हितासाठी करावे जे करणे आत्ताच शक्य आहे. अन्यथा भविष्यात परत कॉँक्रिटीकरण होऊ शकणार नाही व जनतेचे असेच हाल वर्षानुवर्ष होत राहणार. कॉँक्रिटीकरण केल्यामुळे पाणी स्वच्छ राहील तळे धुता येईल स्वच्छ करता येईल ठेवता येईल. असे न झाल्यास याचा निगेटिव्ह परिणाम कोपरगाव शहराच्या वाढीवर, विकासावर, व्यापारावर निश्चित विपरीत होणार. तरी अजून वेळ गेलेली नाही नगरपालिकेने शासन दरबारी प्रयत्न करून तळ्याच्या तळामध्ये कॉँक्रिटीकरणाचे अस्तरीकरण करावे.

## मराठा आरक्षणासंदर्भात फुलंब्री तालुक्यात जनजागृती अभियान

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** पाच ते बारा जुलै दरम्यान फुलंब्री तालुक्यात मराठा आरक्षणासंदर्भात जनजागृती अभियान छत्रपती संभाजीनगर येथे १३ जुलै रोजी मराठा आरक्षणासंदर्भात जनजागृती व शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये फुलंब्री येथील न्य कृषी उत्पन्न बाजार समितीच्या न्त आवारात मराठा समाज 1. बांधवांच्या उपस्थितीमध्ये पाच व ते बारा जुलै दरम्यान फुलंब्री तर तालुक्यात जिल्हा परिषद सर्कल निहाय जनजागृती व संवाद राबविण्यात येणार आहे. औरंगाबाद येथे मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबादच्या सिडको बस स्टँड ते क्रांती चौकादरम्यान मराठा आरक्षण शांतता जनजागृती संवाद महा रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीत लाखोंच्या संख्येने मराठा समाज बांधव सहभागी होणार असून यासाठी फुलंब्री तालुक्यात मराठा क्रांती मोर्चाच्या आतापर्यंत दोन वेळेस बैठका घेण्यात आल्या आहे फुलंब्री तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल निहाय मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीला सहभागी होण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे प्रत्येक सर्कलनिहाय मराठा क्रांती मोर्चा ची पदाधिकारी जनजागृती करणार आहेत मराठा आरक्षण जनजागृती व महासंघ रॅलीत लाखोंच्या संख्येने सहभागी होण्यासाठी मराठा केली समाजाच्या जनजागृती जाणार आहे. फुलंब्री तालुक्यातील गणोरी बाबरा पाल या चार जिल्हा परिषद सर्कल मध्ये पंचायत समितीने निहाय सकाळी संध्याकाळी गावागावात जनजागृती केली जाणार आहे त्यामुळे जास्तीत जास्त मराठा समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा च्या वतीने करण्यात येत आहेत.

## मुखेड नगरपरिषद कर्मचारी संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**मुखेड :** हुतात्मा स्मारक वाचनालय येथील कार्यक्रम पार पडला दि.०२ रोजी श्रीमती रेणुकाबाई यशवंतराव गायकवाड यांचा निरोप समारंभ व नूतन मराठवाडा अध्यक्ष यांचा सत्कार तसेच संवर्ग परीक्षा उत्तीर्ण झालेल्या माया खंडू वाघमारे हिचा सत्कार व मुखेड येथील नूतन कार्यकारणी जाहीर म. रा. नगर परिषद/ नगर पंचायत कर्मचारी /संवर्ग कर्मचारी संघटना शाखा मुखेड. मराठवाडा अध्यक्ष बलभीम शेंडगे यांच्या हस्ते नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. कार्याध्यक्ष ईश्वर फुळवळकर, अध्यक्ष तेजेराव गायकवाड, उपाध्यक्ष रफिक बागवान, आनंदा वाघमारे, सचिव गौतम बनसोडे, सहसचिव संतोष वाघमारे, कोषाध्यक्ष गौरवकुमार जाधव, सहकोषाध्यक्ष सुधाकर कांबळे , प्रसिद्धी प्रमुख माधव कांबळे, संघटक शिवाजी मामीलवाड, विजय कांबळे, अशोक मुखेडकर, कमलाकर जाधव, राजु शिरसे, सल्लगार बी. एल गजलवाड, ए. व्ही. इंद्राळे, शिवशंकर कुच्चेवाड, व्यकट मामीलवाड सदस्य सायबू सिरसे, शेषराव कांबळे, नागेंद्र सिरसे, सायबू कांबळे, रघुनाथ गायकवाड, शे. समदानी, सदानंद जोगदंड. महिला प्रतिनिधी पारुबाई मकलवाड, रेशमाबाई माने, सौ. निर्मलाबाई नवघरे, संगीता बनसोडे, मंगल कमठेवाड आदी कर्मचारी उपस्थित होते.

## वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील सावरगांव पिर येथील दि.०१/०७/२४ रोजी पुतळा माता प्राथमिक शाळेत हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची १११ वी जयंती व कृषी दिन अतिशय उत्साहामध्ये साजरा करण्यात आला या जयंतीच्या निमित्ताने संस्थेचे संचालक माधवरावजी राठोड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी अनिल राठोड,योगेश राठोड व श्री सद्गुरू सेवालाल महाराज कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक व पुतळा मता प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक तसेच सर्व सहशिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होते यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री प्रताप पाटील चौधरी सर यांनी हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला व सूत्रसंचालन म्हणून बसवेश्वर घेवारे सर यांनी केले आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.



## फुलंब्रीत किरकोळ कारणावरुन तीन जणांची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात संध्याकाळी सात वाजेच्या दरम्यान सिल्लोड हुन फुलंब्रीतुन औरंगाबाद कडे एका आयशर ट्रक मध्ये म्हशी घेऊन जात होता, यातच एका संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गाडीला आडवा होत गाडी थांबवली. यातच फुलंब्रीतील स्थानिक युवक जमा झाले. गाडी का थांबवली असे वाहन चालक अभिमन्यू त्रिलोकी प्रसाद यादव राहणार उत्तरप्रदेश यांनी सांगितले तर दुसरा एक युवक त्या दोघांच्या मध्ये जात बोलण्याचा प्रयत्न केला असता तर यामध्ये मारहाणीची घटना घडली. यात दिनांक २ जुलै रोजी रात्री ११ वाजेच्या दरम्यान किरकोळ कारणांच्या मारहाणी वरुन अभिमन्यू त्रिलोकी प्रसाद यादव राहणार उत्तरप्रदेश, जाकेर आत्तार, समीर शहा राहणार फुलंब्री जिल्हा औरंगाबाद यांच्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय सहाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्रीनिवास धुळे हे करत आहे.



# रिसोड तालुक्यात शाळाबाह्य मुले शोध मोहिमेस प्रारंभ

## 20 जुलैपर्यंत होणार सर्वेक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत अधिनियम 2009 नुसार एकही मूल शिक्षणा शिवाय वंचित राहू नये. भारतीय राज्यघटनेच्या कलम 21 (अ) अंतर्गत देशात 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणासाठी शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दरवर्षी शिक्षण विभागाकडुन शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात येते. तसेच मिळालेल्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

या वर्षामध्ये सुध्दा प्राथमिक शिक्षण संचालकांच्या निर्देशानुसार रिसोड तालुक्यातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे 5 ते 20 जुलै यादरम्यान सर्वेक्षण केले जाणार आहे. रिसोड तालुक्यामध्ये विविध कारणांमुळे बालके शाळाबाह्य होतात. तालुक्यात



मोठ्या प्रमाणात मेंढपाळ आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी आपल्या जिल्ह्यात दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबत लहान मुले देखील आहेत. तसेच विविध प्रकारच्या कामानिमित्त कामगारांचे वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतर होत असते.आशा शाळाबाह्य व स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांच्या बालकांना शोध घेत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करून शिक्षण अबाधित राखण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने 5 ते 20 जुलै यादरम्यान सर्वेक्षण राबविण्याचे निश्चित केले आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण हे महत्त्वपुर्ण सामाजिक काम केवळ शासनाच्या एकाच विभागाकडून पुर्णत्वास नेणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे यात शासनाच्या संबंधित सर्व विभागांचा सहभागही तेवढाच महत्त्वाचा असल्याने सर्व विभागांनी एकजुटीने काम करण्याबरोबरच सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते यांनी देखील सहभाग घेतल्यास शाळाबाह्य मुलांच्या शोध मोहिमेचा हेतू पूर्णत्वास जाऊ शकतो. शासन आदेशानुसार शिक्षण विभागाने सर्वेक्षणाचे नियोजन केले आहे. या ठिकाणी राबविण्यात येणार शाळाबाह्य मुले शोधमोहीम जिल्ह्यासह रिसोड तालुक्या मध्ये 5 ते 20 जुलै दरम्यान शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांच्या नोंदी घरोघरी जाऊन घेतल्या जाणार आहेत.याशिवाय. बसस्थानक, हॉटेल, खानावळ, सार्वजनिक ठिकाणे, बाजार तळ, वीटभट्ट्या व अन्य महत्त्वाच्या ठिकाणी शाळाबाह्य व अनियमित तसेच स्थलांतरित मुलांची शोध मोहीम राबविली जाणार आहे.

> 5 जुलै ते 20 जुलै दरम्यान शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे . तालुक्यात सार्वजनिक ठिकाणी, वाड्यावस्त्या, घरोघरी, विटभट्या, हॉटेल, बसस्थानक, अशा विविध ठिकाणी शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करून जी मुले निदर्शनास येतील त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात येणार आहे .
> **बी .एल .कोकाटे .** गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रिसोड

# ‘साहित्य-सागर कालिदास’ लघुनाटिकेचे कालिदासदिनी शहरात सादरीकरण

## हिंदी साहित्य अकादमी, साहित्य भारती यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. 6 जुलै रोजी सायंकाळी 5.30 वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कालिदास दिनाच्या निमित्ताने ‘आषाढस्य प्रथम दिवसे‘ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत महाकवी कालिदासांच्या साहित्यकृतींचा परिचय करून देणारी ‘साहित्य-सागर कालिदास’ ही श्री. नवनाथ पवार लिखित लघुनाटिकेचे सादरीकरण होत आहे. साहित्य भारतीच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष दत्ता जोशी यांनी ही माहिती दिली. ‘साहित्य-सागर कालिदास’ या नवनाथ पवार यांचे लेखन असलेल्या या कलाकृतीत श्रमशक्ती कला अविष्कार, छत्रपती संभाजीनगर संस्थेचे कलाकार यात सहभागी होणार आहेत. याच कार्यक्रमात साहित्य भारती, छत्रपती संभाजीनगरची पहिली कार्यकारिणी जाहीर केली जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक बाबा भांड हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शीतलाप्रसाद दुबे (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी), नितीन केळकर (संघटन मंत्री साहित्य भारती, महाराष्ट्र प्रदेश) व प्रो. निलिम्प त्रिपाठी (आचार्य, महर्षी वैदिक विश्वविद्यालय, भोपाल) यांची उपस्थिती राहणार आहे. शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सादर होणार आहे. कार्यक्रमास प्रवेश खुला व निःशुल्क आहे. सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन साहित्य भारती आणि महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या वतीने करण्यात आले आहे.




आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर : शहरातील रघुवंशी कॉम्प्लेक्स मध्ये आज दुपारच्या सुमारास महाराष्ट्र नवनिर्माण सेना कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अमन अंदेवार यांच्यावर अज्ञात इसमांनी गोळीबार केल्याची घटना घडली. सदर माहितीनुसार रघुवंशी कॉम्प्लेक्स येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष अमन अंदेवार यांचे जनसंपर्क कार्यालय असून या ठिकाणी अज्ञात आरोपी दबा धरून बसले होते याच दरम्यान अंदेवार यांच्या वर गोळीबार करण्यात आला अमन अंदेवार याला एक गोळी पाठीला लागल्याची माहिती आहे. या अगोदर सुद्धा रघुवंशी कॉम्प्लेक्स मध्ये फिल्मी स्टाईल गोळीबार झाला होता. तेव्हा अमन अंदेवार याचा भाऊ आकाश अंदेवार यांच्यावर गोळीबार केले होते.**

# आजचे नवागत हे उद्याचे भविष्य : ठलाल

आधुनिक केसरी न्यूज

**कुरखेडा :** शाळेत जे, नव्याने भरती झालेले नवागत असतात त्यांचे स्वागत करण्याचे शिक्षकांचे, पालक वर्गाचे तसेच विविध क्षेत्रातील लोकांचे काम आहे. त्यांच्या स्वागताने नवागतांना प्रोत्साहन मिळतो त्यांच्यात एक नवीन प्रकारची शिक्षणाच्या बाबतीत आवड निर्माण होत असते सोबतच नवीन उर्जा प्राप्त होत असते. आजचे नवागत हे उद्याचे भविष्य आहेत, असे प्रतिपादन मुळ गाव देऊळगाव येतील सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांनी शाळेच्या पहिल्या दिवसा निमित्त गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यात येणाऱ्या देऊळगाव येतील जि.प. शाळेला दि.४तारखेला भेट दिली. नवागतांचे तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले व नोटबुक, पेन, खाऊ व तसेच शिक्षण उपयोगी साहित्य भेटवस्तू देऊन त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधला आणि भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सोबतच शाळेला भेट वस्तू म्हणून शाळेचे मुख्याध्यापक कोसरे यांच्याकडे काही पुस्तके तसेच दिवाळी अंक भेट म्हणून शाळेला दिली.

शाळेच्या वतीने मुख्याध्यापक कोसरे तसेच विद्यार्थ्यांनी संगीता ठलाल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांच्या साहित्यिक तसेच सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्या शुभ प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक कोसरे, देऊळगाव येतील प्रतिष्ठित नागरिक अमृत ठलाल, पालक नंदलाल उके, भैया कोल्हे, नितेश पटने प्रामुख्याने उपस्थित होते.

# जेजुरीत भंडारा उधळून माउलींचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडेरायाच्या जेजुरी नगरीत गुरुवारी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याचे भंडारा उधळून स्वागत करण्यात आले. संत सोपानकाकांच्या सासवड नगरीतून गुरुवारी सकाळी साडेसात वाजता पालखी सोहळ्याने जेजुरीकडे येण्यासाठी मार्गक्रमण केले. बोरावके मळ्यात सकाळची न्याहारी आणि यमाई शिवरीत भोजन उरकून पालखी सोहळ्याने सासवड ते जेजुरी हा १७ किलोमीटरचा टप्पा पार केला. पालखी सोहळा जेजुरीजवळ आल्यावर लांबून खंडोबाचा गड दिसू लागला. त्यावेळी पालखी रथाच्या पुढे-मागे असणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांनी गाणी, अभंग, भारुडे म्हणत मल्हारी वारी मागितली. जेजुरीचा खंडोबा आणि पंढरीचा विठोबा या दोन्ही दैवतांच्या भक्तिरसात सारेजण न्हाऊन निघाले. पालखी सोहळ्याने सायंकाळी पाच वाजता जेजुरी नगरीत प्रवेश केल्यानंतर खंडोबा देवस्थान आणि जेजुरी नगरपालिकेच्या वतीने रथावर भंडाऱ्याची उधळण करीत स्वागत करण्यात आले. जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, खंडोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त अनिल सौंदाडे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. विश्वास पानसे, पोपट खोमणे, अभिजित देवकते, माजी नगराध्यक्ष दिलीप बारभाई, वीणा सोनवणे, आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे विजय कोलते उपस्थित होते. ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असलेल्या पालखी तळावर समाज आरती करण्यात आली. आळंदी देवस्थानचे मुख्य विश्वस्त ॲड राजेंद्र उमप, विश्वस्त योगी निरंजन नाथ, भावार्थ देखणे उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याची जिद्द ग्रामीण भागाच्या विद्यार्थ्यांमध्येच : नयना गुरव

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव. ता. खुलताबाद जिल्हा संभाजीनगर येथ" गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ नयना गुरव मॅडम विभागीय उपायुक्त महसूल कार्यालय छत्रपती संभाजी नगर, व विशेष उपस्थिती मा .प्रा. शांता भोसले गायकवाड मॅडम सचिव, स्वराज्य शिक्षण संस्था कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय गायकवाड साहेब अध्यक्ष स्वराज शिक्षण संस्था हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी नयना गुरव मॅडम यांनी गुणवंत विद्यार्थी दहावी व बारावी यांच्या स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. वेगवेगळे स्पर्धेत राज्य विभाग जिल्हा पातळीवर विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना विभागीय उपायुक्त मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, मेहनत आणि जिद्द असली की प्रशासनामध्ये अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होते. सर्वात जास्त स्पर्धा परीक्षेत कला शाखेचे विद्यार्थी जास्त यशस्वी होतात आणि ज्यांची नाळ ग्रामीण भागाशी जोडलेली आहे. अधिकारी होण्यासाठी पैसा किंवा श्रीमंती लागत नाही फक्त मेहनत आत्मविश्वास आणि अपयश आले तरी हार न मानता आपण प्रयत्न केले पाहिजे .यश तुमच्याजवळ चालून येईल असे ठामपणे विद्यार्थ्यांना सांगितले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय गायकवाड सर यांनी



सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणात किती ताकद आहे यासाठी स्पर्धा परीक्षा तयारी ही आपल्या शाळेत स्तरावर सुरुवात करा आपल्या विद्यालयात कला शाखेचे विषय घेतले आहे त्याचा उद्देश आपल्या शाळेतील व ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी प्रशासनामध्ये मोठ्या पदावर गेले पाहिजे यासाठी मेहनत व मार्गदर्शन घ्या मी तुमच्यासाठी सदैव प्रयत्न करेन आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश वेताळ यांनी केले तर शाळेचा अहवाल वाचन श्री. किरण ताकटे यांनी केले या कार्यक्रमास प्रतिष्ठित , पालक भानुदास गायकवाड, विष्णू गायकवाड, बळीराम पवार, भाऊसाहेब काळे, श्रीराम गायकवाड कृष्णकांत बनकर, शिवाजीआहे वाड आजी-माजी विद्यार्थी विद्यार्थिनी शाळेतील शिक्षक साळुंके, पाटील, कापडणे ,पवार, नीळ गायकवाड भवरे, डॉ. निंभोरे, बनसोडे, शिंदे ,जाधव, खोंड सौ हिंगोले देवकर ,दत्तू गायकवाड, काळे, जाधव, श्रीमती रंजनाताई कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी पडुळे यांनी केले व आभार प्रदर्शन किरण ताकटे यांनी केले .शेवटी कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने झाला.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मंचावर उपस्थित मराठवाडा विभा गाच्या आयुक्त माननीय नयना गुरव मॅडम यांच्या हस्ते प्रिया आहेवाड सत्कार करताना.या याप्रसंगी मंचावर उपस्थित स्वराज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर संजय गायकवाड तसेच संस्थेच्या सचिव शांता भोसले गायकवाड व शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळ उपस्थित होते.

# मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी योजनेच्या लाभार्थींना नि:शुल्क सेवा मार्गदर्शन दालन

## पात्र महिलांनी योजनेच्या माध्यमातून आपली नोंदणी निःशुल्क करुन घ्यावी : ऋषांक चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** विधानसभा मतदारसंघात नेहमीच समाजसेवेत अग्रेसर असणारी राजमाता जिजाऊ सामाजिक फाउंडेशन व डोणगाव येथील महा-ई-सेवा सेतू केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी या योजनेसाठी ३ टेबल व मोफत निशुल्क मार्गदर्शन व सहकार्य तसेच या योजनेबाबतचे संपूर्ण अर्ज भरणे व मार्गदर्शन करणे व लाभार्थ्यांना सदर योजनेसाठी मोफत अर्ज व त्याची संपुर्ण प्रक्रिया करून देण्यासाठी आज पासून निशुल्क शिबिर आयोजित केले असून सामाजिक जाणीव म्हणून राजमाता जिजाऊ फाउंडेशनचे अध्यक्ष उपाध्यक्ष व महा ई सेतू केंद्र डोणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यासाठी डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण या कार्यक्रमाचे




अध्यक्ष होते व प्रमुख उपस्थितीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. श्री ज्ञानेश्वर टाले तसेच तालुका अध्यक्ष गणेश गारोळे राष्ट्रवादीचे लोडुजी पवार तसेच महा सेवा केंद्राचे संचालक अमोल ठाकरे, विवेक ठाकरे,स्वयसेवक व लाभार्थी तसेच मादणी येथील कास्तकार शिवाजी मेटांगळे तसेच डोणगाव येथील बऱ्याच लाभार्थ्यांनी इथे आज या योजनेसाठी गर्दी केली असून बऱ्याच लाभार्थीनी माहीती घेऊन फॉर्म भरून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आणि एक चांगल्या पद्धतीचा सामाजिक उपक्रम आज राजमाता जिजाऊ सामाजिक फाउंडेशन व महा ई सेवा केंद्र डोणगाव यांच्या संयुक्त विद्यामानाने आज पासून चालू करण्यात आलेला आहे. परिसरातील सर्व पात्र महिला भगिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा सदर लाभ घेण्यासाठी संपूर्णपणे निशुल्क व मोफत सहकार्य करण्यासाठी डोणगांव मेहकर रोडवर डोणगांव अर्बन बकेची नविन इमारत या ठिकाणी राजमाता जिजाऊ फाउंडेशन आणि महा ई सेवा केंद्राच्या वतीने सहकार्य करण्यात येणार असून याचा लाभ परिसरातील महिला भगिनींनी लाभार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.सदर दालन निशुल्क असणार आहे.



# 'कुछ कुछ होता है' हिंदी कव्हर साँग प्रदर्शित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सुवर्ण पुष्प फिल्म निर्मित कुछ कुछ होता है या कव्हर साँग नुकतेच चित्रीत करण्यात आले असून या व्हिडिओ गीताचे उद्घाटन प्रसिद्ध चित्रपट अभिनेते कलावंत संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी कलावंत व निर्माते डॉ. विलास जोंधळे, गायक संगीतकार प्रा. जगदीश वेदपाठक ,दिग्दर्शक के चंद्रशेखर यांची उपस्थिती होती. मराठवाडा विदर्भातील कलावंत कलाकारांना कला क्षेत्रामध्ये संधी देण्याचे कार्य प्रामाणिकपणे करणारी ही कलावंत मंडळी असून कलावंतांच्या अडीअडचणींना दूर करण्यासाठी कलावंताच्या पाठीशी कायम उभा असल्याचे अभिनेते कलावंत संजय बनसोडे यांनी याप्रसंगी उद्घाटन पर बोलताना आपले विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध गायक संगीतकार प्रा जगदीश वेदपाठक त्यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की आपल्या अंगी असणारी कला विविध मंचावर सादरीकरण करून ते रसिकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहिलं पाहिजे आणि त्याकरिता विविध उपक्रम हाती घेणार असल्याचे सांगितले, डॉक्टर विलास जोंधळे यांच्या सहकार्याने तसेच दिग्दर्शक चंद्रशेखर यांच्या मार्गदर्शकाने सर्व कलावंतांच्या सहकार्याने चित्रपट व्हिडिओ ऑडिओ अल्बम याकरिता प्रामाणिकपणाने व जिद्दीने सर्वांनी काम करणे गरजेचे आहे कलाक्षेत्रात काम करीत असताना अनेक अडचणी येत असतात त्याकडे दुर्लक्ष करून केवळ प्रामाणिकपणाने आपल्या कलेचे सादरीकरण कलावंतांनी केली पाहिजे अशी भावना व्यक्त करून गायक संगीतकार प्रा. जगदीश वेदपाठक यांनी सहभागी कलावंतांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुंबई चित्रपटसृष्टीतील नामवंत डीओपी कॅमेरामन अय्याज खान, अभिनेत्री नीलम अहिरे , दिग्दर्शक विकी कांबळे, कलावंत महेंद्र इखारे इखारे अर्चना, नृत्यदिग्दर्शक सुबोध जाधव कॅमेरामन पीओपी कल्याण कोरडे के.के स्टुडिओ, स्टील फोटोग्राफर योगेश चौधरी, मेकअप कलावंत पूजा पांडव, तसेच शहरातील कलावंत कलाकारांची उपस्थिती होती अहिरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# तडेगाव येथे घाणीचे साम्राज्य; डेंगू- मलेरिया साथीच्या रोगांचा धोका वाढला

## शहरातील प्रमुख रस्त्यांवर सांडपाणी आरोग्य विभागाने लक्ष घालावे : ग्रामस्थांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील तडेगाव येथे सांडपाणी रस्त्यांवर आले असून येणार्या जाणार्या लोकाना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे तडेगाव येथील हजरत टिपु सुलतान चौकात हे घाण पाण्याचे गटार साचले असून त्यातून विविध आजारांना आमंत्रण भेटताना दिसत आहे बुधवार रोजी येणार्या आठवडी बाजारात वाहनांना खुपच त्रास सहन करून कसरत करून आपली चारचाकी वाहणे बाजरपेठेत न्यावी लागत आहे .गावकर्यांनी प्रमुख रस्ताच बंध करून ठेवला आहे समस्त गावकर्यांनी प्रमुख गावात जाणारा रस्ता गेला आठ दिवसापासून बंद करून रस्त्यांवर काट्या टाकल्या आहेत. गावातील संरपच ग्रामसेवक यानी याकडे लक्ष द्यावे नाहीतर आदोलनाच हत्यार त्याना उपसावे लागेल असे तिथे राहणारे ग्रामस्थांनी सांगीतले गटारातून जे पाणी साचले आहेत त्यात आता मच्छर होताना दिसत आहे त्यातून डेगु मेलिरिया यांसारख्या साथीच्या रोगाचा प्रसार होण्यास मदत होऊ शकते .प्रमुख रस्त्यां असल्याने शाळेत जाणार्या विद्यार्थ्यांना लाबून दुसर्या पर्यायी रस्ताने जावे लागते जेणेकरून शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना ऊशीर होतो भोकरदन तडेगाव ही बस ही ह्याच कारणास्तव बंद झाली असून त्याकडे गावातील सरपंच ग्रामसेवक व ग्रामपंचायतीत सदस्यांनी ताबडतोब लक्ष घालावे नाहीतर तीव्र आंदोलन करू असे ग्रामस्थांनी सांगीतले आहे.



# आरटीई प्रवेश प्रक्रिया तत्काळ सुरू करावी : डॉ. अभिलाषा गावतुरे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** आरटीई प्रवेश प्रक्रिया तात्काळ सुरू करावे या करीता भूमिपुत्र ब्रिगेड चे डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना निवेदन दिले. शाळांचे सत्र सुरू झाले आहे. मात्र, अद्यापही आरटीई प्रवेशाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. आरटीई प्रवेश रखडल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. शाळा सुरू होऊनही आपल्या पाल्याचा शाळेत प्रवेश झाला नसल्याने पालक चिंतेत पडले आहेत. आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत खासगी शाळांमध्ये प्रवेशासाठी १६ मे पासून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असते.

प्रक्रियेअंतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत संपल्यानंतर शासन स्तरावर लॉटरी काढण्यात आली. परंतु सध्या आरटीई प्रवेशाचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार २५% प्रवेश लॉटरी सोडत जाहीर करण्यात येईल, असा संदेश शासनाच्या आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर देण्यात आला. तरीपण सत्र सुरू होऊन सुद्धा प्रवेश परीक्षा सुरू झालेली नाहीत. तरीपण लॉटरी पद्धत लवकरात लवकर सुरू करून प्रवेश परीक्षा सुरू करावी या मागणीसाठी भूमिपुत्र ब्रिगेडच्या डॉ. अभिलाषा गावतूरे( बेहेरे), छायाताई सोनुले यांच्या द्वारे शिक्षणाधिकारी माध्यमिक आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी पालक नितीन लोणबले, डॉ. राकेश वनकर, विजय मुसळे, प्रवीण देऊळकर आणि सोनल भगत श्रीकांत मुरमुरवार आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# बालकांच्या सर्वांगीण विकासाला 'बूस्टमायचाईल्ड'ची साथ

## कृत्रिम बुद्धिमतेच्या साहाय्याने शिक्षक-पालकांसाठी विकसित स्टार्टअपला वर्धन ग्रुपची एक कोटीची गुंतवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बालकांच्या सर्वांगीण विकासाला आता 'बूस्टमायचाईल्ड' या कृत्रिम बुद्धिमतेचा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स-एआय) वापर करून शाळा, पालक व शिक्षकांसाठी बनवलेल्या खास ॲप व टुलकिटची साथ मिळणार आहे. 'बूस्टमायचाईल्ड'ला लोकाभिमुख करण्यासाठी वर्धन ग्रुपच्या वतीने एक कोटी रुपयांची गुंतवणूक (प्री-सीड फंडिंग) करण्यात आली आहे, अशी माहिती वर्धन ग्रुपचे चेअरमन नितीन जावळकर व 'बूस्टमाईचाइल्ड'चे संस्थापक विपुल जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विपुल जोशी म्हणाले, "बाल मानसशास्त्रज्ञ, बालरोगतज्ज्ञ, बालशिक्षणातील तज्ज्ञ, कृत्रिम बुद्धिमत्ता सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्या चार वर्षांच्या एकत्रित संशोधनातून या प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन शिक्षण धोरण, राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क अंतर्गत बालपणातील काळजी आणि शिक्षण उपक्रमांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विकसित केलेले हे पुरस्कारप्राप्त ॲप एक महिना ते ८ वर्षे वयोगटातील बालकांच्या शाळा, पालक व शिक्षकांना चालना देणारे ठरणार आहे. 'स्कुल असेसमेंट मॉड्यूल'मुळे प्री-स्कुल आणि प्री-प्रायमरी शिक्षकांना बालकांचे मूल्यांकन करण्यासह शिक्षक आणि पालक यांच्यात अखंड संवाद साधणे शक्य होणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून (कोणताही स्मार्टफोन किंवा टॅब्लेट) पालक आपल्या पाल्याचे २१ क्षेत्रांच्या समावेशातील ३६० डिग्रीमधील विकासाचे मूल्यांकन व विश्लेषण करू शकणार आहेत. मुलांमध्ये सुधारणा आणि त्यांचा उत्तम विकास होण्यास प्रोत्साहन देणारी सानुकूलित



मार्गदर्शक तत्त्वे आणि पाल्यासाठी विशिष्ट क्रियाकलाप ॲपच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत.

नितीन जावळकर म्हणाले, "डिजिटल तंत्रज्ञान, गॅजेट्स, सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे भावी पिढीला वेगळे वळण लागत आहे. आई-वडील दोघेही नोकरीत गुंतल्याने पाल्याकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नाही. त्यामुळे आपले मूल नेमके काय करत आहे, त्याची प्रगती, त्याच्या आवडीनिवडी, विषयातील पारंगतता व कल कुठे आहे, हे पालकांनी समजून घ्यायला हवे. आजच्या काळात ही गरज 'बूस्टमाईचाइल्ड' हा प्लॅटफॉर्म पूर्ण करतो, हे माझ्या लक्षात आले. बाल्यावस्थेतील परिपूर्ण विकास होण्यासाठी विपुल जोशी यांचे हे स्टार्टअप मला सामाजिकदृष्ट्या खूपच प्रभावी वाटले. या वयोगटातील बालकांशी निगडित पालक, शिक्षक व शाळांमध्ये याविषयी जागरूकता व त्याचा वापर वाढावा, या उद्देशाने वर्धन ग्रुपने पुढाकार घेत यामध्ये सुरुवातीला एक कोटींची गुंतवणूक केली आहे. राज्यातील प्रत्येक शाळांत हे ॲप पोहोचावे, असा आमचा प्रयत्न राहणार आहे."

अमेरिकेत मास्टर ऑफ सायन्सचे शिक्षण घेतलेल्या पुणेकर सॉफ्टवेअर इंजिनिअर विपुल जोशी यांनी या स्टार्टअपची निर्मिती केली असून, त्याच्या विस्तारासाठी वर्धन ग्रुपकडून एक कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. २०२१ मध्ये याची नोंदणी उद्योग व अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग, एमएसएमईअंतर्गत झालेली आहे. तसेच अर्ली चाईल्डहूड डेव्हलपमेंट फोरमच्या वतीने 'इनोव्हेशन इन अर्ली इयर्स एज्युकेशन' हा पुरस्कारही मिळालेला आहे. भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया सीड फंड स्कीममध्ये मे २०२३ मध्ये २० लाखांचा सीड फंड मिळालेला आहे. 'बूस्टमाईचाइल्ड'मध्ये जोशी यांनी प्राथमिक स्तरावर वैयक्तिक मोठी गुंतवणूक केलेली असून, सध्या पूर्णवेळ १५, तर कंत्राटी पद्धतीवर पाच असे एकूण २० लोक काम करत आहेत. 'बूस्टमाईचाइल्ड' याविषयी अधिक माहितीसाठी WWW.BOOSTMYCHILD.COM या संकेस्थळाला भेट द्यावी. तसेच गुगल पे स्टोअरवर हे ॲप विनामूल्य उपलब्ध आहे. **विपुल जोशी यांच्याविषयी:** सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या विपुल जोशी यांनी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे मास्टर ऑफ सायन्स (एमएस) केल्यानंतर सहा वर्षे सॅनफ्रान्सिस्को येथे अग्रणी ओरॅकल या कंपनीत नोकरी केली. २००८ मध्ये भारतात परतल्यानंतर भारतासाठी आपण काहीतरी करायला हवे, या उद्देशाने संशोधन व टेलीकॉम क्षेत्रात सॉफ्टवेअरची निर्मिती केली. एक उद्योजक म्हणून नाविन्यपूर्ण उत्पादन आणि उत्तम सेवेच्या जोरावर त्यांनी ते सॉफ्टवेअर चार दक्षलक्ष डॉलर्सना विकले. पुढे सेवा क्षेत्रातही त्यांनी स्टार्टअप निर्माण केले. कोविडमुळे डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर, साक्षरता लक्षात घेऊन विपुल यांनी आपल्या समविचारी मित्रांसमवेत 'बूस्टमाईचाइल्ड' या स्टार्टअपवर काम सुरु केले. सखोल संशोधन व नावीन्यतेचा उपयोग करत चार वर्षांत या सॉफ्टवेअरची निर्मिती केली. त्याला भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया अंतर्गत अनुदान मिळाले. तसेच 'इनोव्हेशन इन अर्ली इयर्स एज्युकेशन' हा पुरस्कारही मिळाला. येत्या काळात या ॲपचे ५० हजार वापरकर्ते व दोन कोटींची उलाढाल करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आजवर २००० पेक्षा अधिक युजर्स हे ॲप वापरत आहेत. विविध खासगी शाळा व सरकारी शाळांमध्ये हे ॲप वापरण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत.

**नितीन जावळकर यांच्याविषयी:** वर्धन ग्रुपचे चेअरमन असलेले नितीन जावळकर गेल्या ३० वर्षांपासून बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहेत. २०१८ मध्ये वर्धन ग्रुपच्या स्थापनेनंतर त्यांनी गुंतवणूक, अधिग्रहण व कायदेशीर प्रक्रिया, सल्ला व मार्गदर्शन क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. प्रामाणिकता, वचनबद्धता, नाविन्यता, ग्राहकांचे समाधान, जबाबदारी व बांधिलकी या मूल्यांवर आधारित वर्धन ग्रुप दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यासह जावळकर यांनी सामाजिक बांधिलकीचे भान जपलेले आहे. वृद्धाश्रम, अनाथांसाठी काम करणाऱ्या संस्था यासह शिक्षण, आरोग्य व कौशल्य विकासाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान मोलाचे आहे. याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून येणारी पिढी सुसंस्कृत व्हावी, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, या हेतूने 'बूस्टमाईचाइल्ड' या स्टार्टअपच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आणि त्याला व्यापकता प्राप्त करून देण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे.

# आमदार संदीप क्षीरसागर यांनी शेतीप्रश्न विधानसभेत मांडला

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** रानडुकरांमुळे शेतीचे नुकसान होऊन शेतकरी सर्व प्रकारच्या विवंचनेत येतात. उभ्या 1 पिकांचे रानडुकरांकडून पुर्णतः नुकसान केले जाते. याबाबत आ. संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधी सत्रातील पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनमध्ये विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. शेतात धुडगूस घालून शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस रानडकरे करतात. अनेकवेळा उभी पिके जमीनदोस्त रानडुकरांनी केलेली आहेत. रानडुकरांच्या धुमाकूळाने ग्रामीण भागातील शेतकरी हैराण झाला आहे. दरम्यान, प्रशासनाकडून याबाबत कसलीही ठोस आणि प्रत्यक्ष उपाययोजनापर कार्यवाही होत नाही. अगोदरच आस्मानी आणि सुलतानी संकटांनी राज्यातील शेतकरी त्रस्त आहे सोबतच रानडुकरे आणि इतर जंगली प्राण्यांचा त्रासही शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. यावर आ. संदीप क्षीरसागर यांनी सुरू असलेल्या विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या लक्षवेधी सत्रातील पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनमध्ये प्रश्न मांडला. केल्या गेलेल्या उपाययोजना अयशस्वी रानडुक्कर व इतर जंगली प्राणी यांच्यापासून पिकांचे रक्षण करण्यासाठी चारी आणि तारीचे कंपाऊंड अशाप्रकारच्या उपाययोजना अगोदरपासूनच प्रचलित आहेत परंतु चारीच्या वरून रानडुकरे उड्या मारून शेतात घुसतात. तसेच, तार कंपाऊंडच्या खाली चर खोदून ते आत शिरतात त्यामुळे सध्याच्या उपाययोजना अयशस्वी ठरलेल्या आहेत. याबाबीवर आ.क्षीरसागर यांनी प्रकाश टाकला.



# आषाढी एकादशी वारीत शिवशक्ती आश्रमाची वृक्षदिंडी

## गाव तेथे वृक्षारोपण : बालयोगी खडेश्वरी बाबा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** तुपेवाडी येथील शिवशक्ती आश्रमाच्या माध्यमातून तुपेवाडी ते पंढरपूर मार्गे पायी दिंडी सोहळा व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले असून प.पू.खडेश्वरी बाबा आणि देवा बाबांच्या पुढाकारातून दिंडीमार्गे गाव तेथे वृक्षारोपण हा उपक्रम हाती घेतला असून स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने हजारो झाडांच्या कलमांची लागवड केली जात आहे. या उपक्रमास उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असून सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आषाढी एकादशी निमित्त शिवशक्ती आश्रमाच्या वतीने पायी दिंडी व वृक्षरोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.त्याचाच एक भाग म्हणून अंबड रोडवरील अंतरवाला ,पारेश्वर महादेव मंदिर,शेवगाव फाटा आदी ठिकाणी ग्रामस्थांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. शिवशक्ती आश्रम ते पंढरपूर दरम्यान कडुलिंब,पिंपळ,वड, जांभूळ या कलमांचे वृक्षारोपण करून संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. दिंडी ज्याठिकाणी मुक्कामी राहते त्याठिकाणी ग्रामस्थांच्या मदतीने शाळा व मंदिर परिसर, मोकळी जागा तसेच रस्त्याच्या कडेला दुतर्फा वृक्षारोपण करून स्थानिक नागरिकांना संवर्धनाची जबाबदारी दिली जात आहे. तुपेवाडी येथील शिवशक्ती आश्रमांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांगजनांचा भव्या मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडयातील अनेक दिव्यांगजन केंद्र शासनाच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या सोयी सवलतीपासून वंचित आहेत. अलियावर जंग इन्स्टिट्युट, ब्रांदे मुंबई, आटिफिशियल लिंब्स मॅन्युफॅक्चरिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ मुंबई, समाज कल्याणविभाग इत्यादी संस्थातर्फे दिव्यांगाना व्हिल चेअर, ॲटोमॅटिक सायकल, श्रवण यंत्रे, कर्ज इत्यादी मिळते. परंतू दिव्यांगजनापर्यत या योजना पोहचत नाही. मा.बच्चू कडू साहेब, संस्थापक अध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त मराठवाडयातील दिव्यांगजनांना वरील सर्व सोयींचा लाभ मिळावा यासाठी सर्व दिव्यांगजनांचा मेळावा महानगर गार्डन स्वामी बिल्डिंग समोर, सेवन हिल्स कॉलनी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे मंगळवार दिनांक ९ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित केला आहे. तरी या मेळाव्यासाठी मराठवाडयातील सर्वजनांनी सर्व कागदपत्रास उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष डॉ. जे. के. जाधव, छत्रपती संभाजीनगर, जिल्हा अध्यक्ष सुधाकर शिंदे, शहराध्यक्ष कुणाल राउत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ.जे. के. जाधव, मोबाईल क्रं. ९८७००२८२३४/ ९९७५७४८१७७ यांचेशी संपर्क करावा.

# घाटबोरी ग्रामपंचायत समोरच्या उपोषणकर्त्यांच्या चौथ्या दिवशी मागण्या मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा नेते अंकुश राठोड यांनी मेहकर तालुक्यातील घाटबोरी ग्रामपंचायतच्या समोर विविध मागण्याच्या अनुषंगाने दिनांक १ जून 2024 रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. सदर मागण्याच्या अनुषंगाने घाटबोरी नागेशवाडी टेंभुर्खेड या गावातून नागरिकांचा भरभक्कम जाहीर पाठिंबा मिळत असल्याचं प्रशासनाच्या लक्षात आलं म्हणून दिनांक 3 जून 2024 रोजी मेहकर तहसीलदार श्री मडके तसेच डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री अमरनाथ नागरे यांनी उपोषणकर्त्याची भेट घेऊन त्यांच्या मागण्या संदर्भात माहिती घेतली व उपोषण सोडवण्याचा प्रयत्न केला मात्र संबंधित विभागाचा एकही अधिकारी कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे सदर उपोषण सुटू शकले नाही. सदर उपोषणाचा आजचा चौथा दिवस असून त्यांची शुगर कमी झाली व बीपी कमी झा.

यावावत पंचायत समिती प्रशासनाला स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष यांनी धारेवर धरले व उपोषणकर्त्याच्या मागण्याच्या अनुषंगाने तत्काळ लेखी देऊन सदर उपोषण सोडवावे अशी विनंती केली अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून आक्रमकपणे आंदोलन करेल असा इशारा पंचायत समिती प्रशासनाला दिला त्यामुळे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री गवई, श्री पंडागळे बांधकाम विभागाचे ग्रामपंचायत सचिव श्री शेळके तातडीने उपोषण स्थळी हजर झाले. स्वाभिमानी शेतकरी



संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले डोणगाव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष गणेश गारोळे घाटबोरी सरपंच राजूभाऊ पाखरे यांच्या मध्यस्थीने अखेर संबंधित प्रशासनाकडून लेखी घेत अखेर स्वाभिमानीचे कार्यकर्ते अंकुश राठोड यांना शरबत पाजून आमरण उपोषण सोडवले. यावेळी स्वाभिमानचे ज्ञानेश्वर दांदडे, राजूभाऊ कुसळकर, शंकर गिरी,प्रविण सुरेश डोंगरे,भाष्कर चोपडे,संदिप बोंदाडे,अशोक राठोड,परमानंद चव्हाण,बाळु नवले,पंकज नवले,शेख रहेमान.असख्य नागरिकांची उपस्थिती होती.

# परभणे, बियाणी, कुलकर्णी, शिंदेला १५ दिवसांत बेड्या ठोका

## प्रा. सचिन उबाळेंचा अल्टिमेटम; ७ दिवसांनंतर उपोषण स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स बँकेविरोधात गेल्या ७ दिवसांपासून सुरु केलेले स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांचे उपोषण बुधवारी प्रशासनाच्या मध्यस्तीने तात्पुरते स्थगित करण्यात आले. दरम्यान साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेटचे अध्यक्ष साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी तसेच ज्ञानराधाचे अध्यक्ष यशवंत कुलकर्णी तसेच सर्व पतसंस्थांच्या संचालक मंडळांना अटक करावी, यासाठी प्रा. उबाळे यांनी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला. हजारो ठेवीदारांच्या प्रश्नावर प्रा. उबाळे यांनी आवाज उठविला, मात्र जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते मंडळी कधी बोलणार? हा प्रश्न अधिवेशनात कोणी मांडणार का ? असा सवाल ठेवीदारांमधून उपस्थित केला जातोय. जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था, मल्टिस्टेटमध्ये अडकलेल्या ठेवी तात्काळपणे ठेवीदारांना मिळाव्यात, तसेच या सर्व बँकांची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी आदी मागण्यांसाठी स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष कृतीसमितीचे मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन उबाळे यांनी पुन्हा एकदा आक्रमक होत उपोषणाचे हत्यार उपसले. गेल्या सात दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवसृष्टीजवळ उबाळे यांनी उपोषण सुरु असून त्यांची प्रकृती खालावत गेली. दरम्यान उपोषण काळात एकाही लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्याने उपोषणस्थळी भेट दिली नाही. मंगळवारी खासदार बजरंग सोनवणे यांनी ठेवीदारांचे आंदोलन गांभीर्याने घ्या, असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठिवले. यानंतर बुधवारी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, पोलीस उपअधीक्षक विश्वांभर बोल्डे, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन परांडकर, तहसीलदार सुहास हजारे, उपनिबंधक जाधव, पोलिस निरीक्षक शीतकुमार बल्लाळ यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांच्या भावना समजून घेतल्या. सर्व अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास कशा प्रकारे चालू आहे. तसेच कायदेशीर बाबी ठेवीदारांसमोर मांडल्या. ठेवीदारांना त्यांच्या ठेवी नक्की परत मिळतील असा विश्वास प्रशासनाने दिली. परभणे, बियाणी, कुलकर्णी, शिंदे यांच्यासह इतर पतसंस्थांचे अध्यक्ष व संचालक मंडळांना यांना करा अशी मागणी प्रा. सचिन उबाळे यांनी केली. यासाठी उबाळे यांनी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला. प्रशासनाने ही मागणी मान्य केल्यानंतर ठेवीदारांना विचारुन प्रा. उबाळे यांनी उपोषण तात्पुरते स्थगित केले. यावेळी ठेवीदारांनी आक्रमक पावित्रा घेतला होता. दरम्यान, उपोषण मागे घेतल्यानंतर उबाळे यांना फिनिक्स हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.




# कंधार कृषी विभागामार्फत महिलांची शेती शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** तालुक्यातील बीजेवाडी येथील दि.३ जुलै रोजी उपविभागीय कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, तालुका कृषी अधिकारी विठ्ठल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मंडळ कृषी अधिकारी भारत वाठोरे यांच्या सहकार्याने बिजेवाडी येथे महिलांची शेती शाळा घेण्यात आली. यावेळी कृषी सहाय्यक अनुसया केंद्रे यांनी जुने राज्य पुरस्कृत सोयाबीन उत्पादकता वाढवा मूल्य साठी विकास या योजने अंतर्गत बिजेवाडी येथे सोयाबीन पिकाबद्दल महिलांची शेती शाळा घेतली शेती शाळेमध्ये सोयाबीन मधील नियंत्रण कीड नियंत्रणाबद्दल सखोल मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित सर्व महिला शेतकऱ्यांना गोगलगाय नियंत्रणासाठी मार्गदर्शन करून शेती शाळेची सांगता केली.

# बस उलटून आठ प्रवासी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** मनमाड ते मालेगांव राष्ट्रीय महामार्गावर कुंदलगाव शिवारात गुरूवारी दुपारी राज्य परिवहन महामंडळाची बस रस्त्याच्या कडेला उलटून आठ प्रवासी जखमी झाले. चालकासह सहा प्रवाशांना येथील उपजिल्हा रुग्णालयात तर, इतर दोघांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राज्य परिहवन महामंडळाच्या बसला अपघात होण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसात वाढले आहे. पुणे-दोंडाईचा ही बस मनमाडहून मार्गस्थ झाल्यानंतर कुंदलगाव शिवारात अपघात झाला. पाऊस सुरू असताना चालकाने अचानक ब्रेक मारला. त्यामुळे बस घसरत रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. या अपघातात कमलेश निकम (चालक), चैतन्य शर्मा (१७,नंदुरबार), शिवाजी पाटील (६०, कन्हेरे अमळनेर), शोभा भोई (अहमदनगर), मिना पुराबिया (६०, अहमदनगर), मिनाबाई पाटील (५०, अमळनेर) हे प्रवासी जखमी झाले. अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना बाहेर काढले. रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. पुणे-दोंडाईचा या बसमधून २७ प्रवासी प्रवास करत होते.



# निसर्ग व पर्यावरण मंडळाचे कार्य आदर्शवत : डॉ. शरद दुधाट

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** उष्णता, हवा, पाणी यांचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी ह्या कार्याची सुरुवात आपल्यापासून करावी. या कार्यप्रती निसर्ग व पर्यावरण मंडळाचे वृक्षसंवर्धनाचे कार्य आदर्शवत आहे, असे प्रतिपादन डॉ. शरद दुधाट यांनी केले. संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील डी. के. मोरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे निसर्ग व सामाजिक प्रदूषण मंडळाचे अहमदनगर जिल्हा कार्याध्यक्ष व नवनियुक्त पदाधिकारी बाळासाहेब कडू यांची मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य साहेबराव कोल्हे हे होते. याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकारी बाळासाहेब कडू यांचा मंडळाचे राज्यसंघटक डॉ. दुधाट यांच्या हस्ते वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत आणि आभार पोपट दये यांनी केले. याप्रसंगी जिल्हा संघटक राधाकिसन दिघे, रवींद्र पठारे, अरुण कुळसुंदर, उपप्राचार्य प्रतापराव आहेर, पर्यवेक्षिका श्रीमती रणशुर यांच्या शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा कार्यकारणी सदस्य अर्जुन राऊत यांनी आपल्या मनोगतातून पर्यावरण प्रदूषणाचे महत्त्व विशद केले. यावेळी डॉ. दुधाट यांनी आपल्या मनोगतात सांगितले की वृक्षमित्र स्व.आबासाहेब मोरे यांच्या कार्याचा वारसा त्यांचे पुतणे मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे हे यशस्वीरित्या सांभाळत असून पर्यावरण समतोलासाठी हे मंडळ महाराष्ट्रभर अविरतपणे कार्यरत आहेत. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संगमनेर परिसरात पर्यावरण वाचविण्याचा आदर्शवत उपक्रम सुरू असून या उपक्रमातून लाखो रोपांचे रोपण आणि संवर्धन होत आहे. शेवटी बाळासाहेब कडू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# चोरट्यांनी एटीएम तोडून लाखो रुपयांची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** निफाड तालुक्यातील विंचूर येथे नाशिक-येवला रस्त्यावरील स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम मोटारीतून आलेल्या चोरांनी गॅस कटरच्या सहाय्याने तोडून लाखो रुपयांची रक्कम लुटून नेली. रात्री दीड वाजेच्या सुमारास चोरट्यांनी एटीएम केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर फवारा मारला. त्यानंतर एटीएममधील सर्व रक्कम घेऊन ते फरार झाले. एटीएममध्ये गडबड होत असल्याचा संगणकीकृत संदेश लासलगाव पोलीस ठाण्यात येताच तातडीने सहायक निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पथक घटनास्थळी दाखल झाले. परंतु, तोपर्यंत चोरटे फरार झाले होते. बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास एटीएममध्ये सुमारे ३३ लाख रुपये भरण्यात आले होते, असे समजते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in





# कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांची प्रक्षेत्र भेट

## कंधार कृषी विभागामार्फत झालेल्या विविध विकास कामांचा आढावा !

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** तालुक्यात कृषी विभागामार्फत झालेल्या विविध विकास कामांना आढावा घेण्यात आला यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी प्रक्षेत्र ठिक-ठिकाणी भेटी देण्यात आल्या. दि.३ जुलै रोजी भेटीदरम्यान यांनी मंगेश कांबळे यांच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत उभारलेल्या अपेक्षा मिरची मसाले उद्योगास भेट दिली. संबंधितास ब्रॅण्डिंग मार्केटिंग बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी गुलाबवाडी येथील शेतकरी जळबा कांबळे यांच्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अंतर्गत सन २०२३ मध्ये लागवड केलेल्या आंबा फळबागेस भेट दिली,जंगमवाडी येथे गोविंदराव पोरडवार यांनी सन २०२३ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत लागवड केलेल्या आंबा फळ बागेस भेट दिली. संबंधितास मार्गदर्शन केले. रामदास टेंभुर्णे आंबुलगा येथे रुंद सरी वरंबा पद्धतीचा अवलंब करून टोकन पद्धतीने लागवड केलेल्या सोयाबीन प्रक्षेत्रास भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले,श्रीमती विजया रंगराव जाधव राहणार गांधीनगर यांच्या प्रक्षेत्रावर सीआरए तंत्रज्ञानाचा अवलंब करून आंबा लागवड करण्याविषयी लागवड केली,स्वतः सीआरए पद्धतीने आंब्याची लागवड करून दाखवली. प्रक्षेत्र भेटी दरम्यान तालुका कृषी अधिकारी विठ्ठल गीते, मंडळ कृषी अधिकारी भारत वाठोरे,मंडळ कृषी अधिकारी माधव गुट्टे, कृषी सहाय्यक सौ.अनुसया केंद्रे,भूषण पेठकर,सतीश वाघमारे, नामदेव कुंभारे, सौ.उज्वला देशमुख व विनोद पुलकुंडवार शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्रीनिवास महाराजांचे सुलतानपूर येथे पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपूर येथे श्रीखंडे पाटील कुटुंबीयाकडून हभप श्रीनिवास महाराज यांचे पुजन करण्यात आले. श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट उत्राण ता एरंडोल जिल्हा जळगाव ह भ प श्रीनिवास महाराज यांचे पंढरपूर वारी निमित्ताने आमच्या सुलतानपूर येथील निवासस्थानी दिंडीचे आगमन झाले यावेळी श्रीखंडे पाटील सुलतानपूरकर परिवारातर्फे महाराजांचे पूजन करण्यात आले.यावेळी महाराज यांनी सर्वस्वी आशिर्वाद दिले.

# वीरगो डिस्टिक पार्क मुंबादेवी एंटरप्रायजेसच्या कामगारांना पगारवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील अनेक गोदामामधील कामगारांना आपलेसे वाटणारे कामगार नेते रवी घरत यांच्या द्रोणागिरी जनरल कामगार संघटनेच्या वतीने कामगारांचे वेतनवाढ करण्याचा धडाका सुरूच असल्याचा प्रत्यय आज पुन्हा आला त्यांनी आहे. खोपटे येथील वीरगो डिस्टिक पार्क मुंबादेवी एंटरप्रायजेसच्या कामगारांना तब्बल ६ हजार रुपायांची पगारवाढ मिळवून दिली आहे. उरण तालुक्यात कंटेनर गोदामांचा व्यवसाय गेल्या काही वर्षात अगदी वाऱ्याच्या वेगाने वाढला आहे . अशी सरकारी आणि खाजगी गोदामे बहुतांशी ठिकाणी ठेकेदारांच्या माध्यमातून चालविली जात आहेत . अशी गोदामे चालविणारे ठेकेदार अनेकदा आपली मनमानी देखील करीत आहेत. मात्र कामगारांचे प्रश्न आणि ते सोडविण्याची धमक असलेले कामगार नेते रवी घरत यांनी कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आक्रमक भूमिका घेतली आहे. त्या मुळे व्यवस्थापनांना नमते घेऊन कामगारांचे वेतन करार करावे लागत आहेत. त्याचाच प्रत्यय वीरगो डिस्ट्रिक पार्कच्या कामगारांना आला आहे. या कामगारांना तब्बल सहा हजारांच्या पगार वाढीसह या करारानुसार मेडिकल पॉलिसी, सुरक्षिततेची उपकरणे, हक्काच्या रजा, बोनसच्या रूपात एक पगार आणि प्रत्येक वर्षाला पगारात वाढ करण्याचे या निमित्ताने मान्य करण्यात आले आहे. या कराराबाबत बोलतांना कामगार प्रतिनिधी अतिश भगत यांनी सांगितले की कामगार नेते रवी घरत यांनी अशक्य त्या गोष्टी शक्य करून दाखविल्या असून त्यांच्यावर आम्ही कामगारांनी टाकलेला विश्वास खऱ्या अर्थाने सार्थ केल्याचे या निमिताने सांगितले आहे. कायद्यांच्या योग्य अभ्यासाने कंपनी प्रशासनाला कामगारांच्या वेतन करार करायला भाग पाडण्याची किमया ते करीत आहेत हे कामगारांसाठी अतिशय महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगीतले.



# सोबलगाव येथे खरीप पीक हंगामपूर्व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथे खरिप पिक हंगाम पुर्वी २०२४ शेतकऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.आज दिनांक ०४/०७/२०२४ रोजी मौजे सोबलगाव तालुका खुलताबाद येथे हंगाम पूर्व प्रशिक्षण २०२४ घेण्यात आले व स्मार्ट कॉटन कार्यप्रणाली बाबत कापूस मुंल्य साखळी उपस्थित शेतकऱ्यांना संपूर्ण माहिती देण्यात आली .शेतकऱ्यांचे गट स्थापन करणे, गटातील शेतकऱ्यांचे संपूर्ण कागदपत्र जमा करणे ,नोंदणी करणे इत्यादी बाबत माहिती देण्यात आली याप्रसंगी स्मार्ट कॉटन प्रकल्पाचे प्रस्तावना स्मार्ट कॉटन प्रकल्प कसा राबवायचा याबाबत तालुका कृषी अधिकारी श्री ज्ञानेश्वर तारगे सर यांनी दिली स्मार्ट प्रकल्पाचे महत्व याबद्दल माहिती दिली .श्री डी आर सोमवंशी साहेब मल्टी टास्किंग ग्रेडर यांनी स्मार्ट प्रकल्प बाबत कापूस व गाठी सरकी विक्री व प्रत्यक्षात होणारा शेतकऱ्यांचा फायदा याबाबतचे महत्त्व सांगितले. तसेच वरिष्ठ शाश्त्रज्ञ् डॉ ओमप्रकाश कोहिरे सर यांनी कापूस पिकाबद्दल संपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच मंडळ कृषी अधिकारी श्री.काकासाहेब इंगळे सर व कृषी पर्यवेक्षक श्री. राहुल गायकवाड साहेब व कृषी सहाय्यक डि. बी. हिंगे साहेब यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी न्यू बळीराजा शेतकरी गट व उंच भरारीमहिला शेतकरी गट उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर